# महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये आदेश

अर्ज क्रमांक ०७/२०१६

जा.क्र.जिउनि/सावकारी/कलम१८/सुआपा/वरठाण/ 1677 /२०१६

औरंगाबाद दिनांक २३/०३/२०१६

**वाचा :-**

१. श्री सुनिल आनंदा पाटील रा. वरठाण ता. सोयगांव जि. औरंगाबाद यांचा तक्रार अर्ज दि.३/६/२०१५व इतर तक्रारदार यांचा अर्ज दिनांक ०३/०५/२०१५
२. या कार्यालयाचे पत्र दिनांक ११/०८/२०१५ व १४/०९/२०१५
३. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. सिल्लोड यांचा अहवाल दिनांक १३/०१/२०१६
४. श्री. डि.डि.जैस्वाल चौकशी अधिकारी यांचा चौकशी अहवाल दिनांक १३/०१/२०१६
५. श्री सुनिल आनंदा पाटील रा. वरठाण ता. सोयगांव जि. औरंगाबाद यांचा अर्ज व शपथपत्र या कार्यालयास प्राप्त दिनांक १८/०१/२०१६
६. या कार्यालयाची महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये नोटीस जा.क्र. जिउनि/सावकारी/क १८/३९५/२०१६ दिनांक २५/०१/२०१६

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD * DIST. AURANGABAD

श्री. सूनिल आंनदा पाटील
रा. वरठाण ता. सोयगांव जि. औरंगाबाद — अर्जदार

**विरूध्द**

१. श्री. चिंतामण नारायण राऊत
रा. वरठाण ता. सोयगांव जि. औरंगाबाद — गैरअर्जदार
२. श्री. सुभाष बळीराम ठाकरे
रा. वरठाण ता. सोयगांव जि. औरंगाबाद
३. सौ संगिता सुभाष ठाकरे
रा. वरठाण ता. सोयगांव जि. औरंगाबाद

ज्याअर्थी वाचा क्रमांक १ अन्वये मुळ तक्रारदार श्री. बाळु त्र्यंबक खंडाळे रा. वरठाण ता. सोयगांव जि. औरंगाबाद व इतर यांनी तसेच प्रस्तुत अर्जदार श्री. सुनिल आनंदा पाटील यांनी गैरअर्जदार १ श्री. चिंतामण नारायण राऊत (या पुढे ज्यांचा उल्लेख गैरअर्जदार १ असा केलेला आहे.) यांचे विरूध्द अवैध सावकारी संबंधाने तक्रारअर्ज सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था सिल्लोड यांचे कार्यालयात दिलेला आहे तसेच सदर तक्रारअर्ज या कार्यालयाकडे ही प्राप्त झालेला असल्याने सदरचा तक्रारअर्ज चौकशी करिता वाचा क्रमांक २ नुसार या कार्यालयाने सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. सिल्लोड यांचेकडे पाठविलेला आहे. त्यानुसार सहाय्यक निबंधक सहकारी संस्था सिल्लोड यांनी त्यांच्या कार्यालयातील श्री. डि.डि.जैस्वाल, सहकार अधिकारी श्रेणी-१ यांच्या मार्फत चौकशी केलेली असून श्री. जैस्वाल यांनी त्यांचा चौकशी अहवाल वाचा क्रमांक ४ नुसार सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. सिल्लोड यांच्याकडे सादर केलेला आहे.

ज्याअर्थी वाचा क्रमांक ५ अन्वये अर्जदार यांनी रू. १०० च्या प्रतिज्ञापत्रावर सावकारीच्या ओघात खरेदीखत करून दिलेली शेतजमिन परत मिळणे बाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जा सोबत श्री. डी.डी.जैस्वाल सहकार अधिकारी श्रेणी-१ यांचा दिनांक १३/०१/२०१६ चा चौकशी अहवाल व सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. सिल्लोड यांचा अहवाल दिनांक १३/०१/२०१६ तसेच त्यासोबत चौकशीच्या वेळी झालेले जाब जवाब,पुरावे इ. कागदपत्रे सादर केलेले आहे.

सदर शपथपत्रात प्रस्तुत अर्जदार श्री. सुनिल आनंदा पाटील यांनी असे नमुद केले आहे की, त्यांना भावाच्या आजारपणासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी वरठाण येथील खाजगी सावकार गैरअर्जदार १ ह.मु.श्रीरामपुर यांच्या कडुन रू.१२००००/- अक्षरी रूपये एक लाख विस हजार मात्र दमादशे ३% व्याज दराने सन २००९ मध्ये घेतलेले होते. या पैशास धर म्हणुन त्यांनी त्यांच्या नावावर असलेली वरठाण शिवारातील गट नंबर ६६ मधील ६४ आर शेतजमिन खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांचा भाचा गैरअर्जदार २ यांची पत्नी गैरअर्जदार ३ यांच्या नावाने मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर जमिन वापस देण्याच्या तोंडी.बोली ठेऊन कायम खरेदीखताच्या आधारे लिहुन दिलेली आहे. सदर व्यवहार हा सावकारी व्यवहार असल्याने शेतजमिन त्यांच्याच ताब्यात आहे. त्या शेतजमिनीवर मका व कापूस हे दोन पिके घेतलेली आहे. आतापर्यंत गैरअर्जदार १ यांना मुद्दल व व्याज मिळुन सन २०१० ते २०१५ या कालावधीत रू.२१५०००/- परत केलेले आहे. सदर शेतजमिनीचे खरेदीखत सावकार गैरअर्जदार १ यांनी त्याचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या घरीच ठेवलेले होते. सदर सावकार गैरअर्जदार १ आनखी रू.२०००००/- अक्षरी रूपये दोन लाखाची मागणी करीत आहे. ती न दिल्यास जमिन परस्पर विक्री करण्याची धमकी देत आहे. सदर सावकार गैरअर्जदार१ व त्यांच्यामध्ये जमिन खरेदीविक्रीचा व्यवहार नसुन व्याजी व्यवहार आहे. त्याबदल्यात जमिन परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर शेतजमिन त्याच्या हस्तक गैरअर्जदार २ यांच्या पत्नीच्या गैरअर्जदार ३ यांच्या नावावर लिहुन दिलेली आहे या सावकारी व्यवहारात गावातील पाच पंच श्री. अरूण नवलसिंग शिन्दे, श्री. बालु त्रिंबक खंडाळे, श्री .उमेदसिंग भावसाहेब सोळुंके, श्री .प्रकाशसुपडु सुर्यवंशी व श्री .बापु दादा सोळुंके हे साक्षीदार आहेत.

त्या अर्जास अनुसरून या कार्यालयाने वाचा क्रमांक ६ नुसार महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये सुनावणी नोटीस निर्गमित करून दिनांक ०८/०२/२०१६ रोजी सुनावणी ठेवलेली होती. सुनावणीस अर्जदार स्वतः हजर होते, गैरअर्जदार १,२ व ३ यांच्या वतीने ॲड एस.एस.गिरी यांनी वकील पत्र दाखल करून लेखी म्हणने मांडण्यासाठी वेळ देण्याबाबत विनंती केली. त्यानुसार पुढील सुनावणी दिनांक १५/०२/२०१६ रोजी घेण्यात आली या सुनावणीस अर्जदार हजर होते. तसेच गैरअर्जदार १ ते ३ मार्फत त्यांचे अभियोक्ते श्री. आर.ए.गिरी हजर झाले त्यांनी गैरअर्जदार यांच्या वेतीने लेखी म्हणने सादर केले. त्यांचे लेखी म्हणने हाच युक्तीवाद आहे असे सांगितले. अर्जदार यांनी त्यांचे शपथपत्र, लेखी अर्ज व चौकशी अहवाल सादर केला आहे. तसेच अर्जदार

यांनी तोंडी म्हणने मांडले की, त्यानी दाखल केलेले शपथपत्र अर्ज तसेच चौकशी अधिकारी यांनी गैरअर्जदाराच्या घरी घेतलेली घरझडती त्यानुसार चौकशी अधिकारी यांनी मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सिल्लोड यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालानुसार गैरअर्जदारास शेतजमिन सावकारी चे ओघात गहाण ठेवुन खरेदीखता द्वारे लिहुन दिलेली आहे. या चौकशी अहवालानुसार व त्यांचे अर्जानुसार त्यांची शेतजमिन परत मिळणे बाबत प्रस्तुत अर्जदार यांनी नमुद केलेले आहे.

गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ व ३ यांचे वतीने त्यांचे अभियोक्ते ॲड श्री. आर.ए.गिरी यांनी उपस्थित होऊन त्यांचे लेखी म्हणने सादर केले. त्यात असे नमुद केले की, मुळ तक्रारदार श्री. बालु त्र्यंबक खंडाळे व प्रस्तुत अर्जदार यांचा सदरचा अर्ज खोटा असून गैरअर्जदार यांना त्रास देण्याच्या उद्देशाने सादर केलेला आहे. प्रस्तुत अर्जदारांनी नमुद केलेली गट नंबर ६६ मधील ६४ आर जमिन सावकारीच्या ओघात प्रतिभुती म्हणुन घेतल्याचे खोटे आहे. तसेच गट नंबर १४७ मधील ९५ आर पैकी ५५ आर शेतजमिन सावकारीच्या ओघात प्रतिभुती म्हणुन घेतल्याचे खोटे आहे. तसेच गैरअर्जदार यांनी शेतजमिनीचे खोटे खरेदीखत केलेले आहे. तसेच ते परत पलटवुन देण्याच्या बोलीवर करून घेतलेले होते हे सुध्दा खोटे आहे. अर्जदार यांनी गैरअर्जदार यांना व्याजासह रक्कम दिली. तसेच त्यांचा सावकारी व्यवहार आहे हे म्हणने खोटे आहे अर्जदारांनी गैरअर्जदारांना त्रास देण्याच्या उद्देशाने खोटी तक्रार दाखल केली आहे. तसेच गैरअर्जदार १ यांचा गैरअर्जदार २ व ३ यांच्याशी कोणताही संबंध नाही. ते केवळ नातलग आहे. गैरअर्जदार हे अहमदनगर येथे राहतात. तसेच गैरअर्जदार २ व ३ हे वरठाण ता. सोयगांव येथे राहतात. गैरअर्जदार २ व ३ हे मौजे वरठाण ता. सोयगांव जि.औरंगाबाद येथील गट नंबर २०६ मधील एकूण क्षेत्र ३ हेक्टर ८२ आर पैकी ८७ आर जमिनीचे खरेदीदार व कब्जेदार आहेत. त्या बाबत चा ७/१२ उतारा सुनावणीच्या वेळी सादर करीत असल्या बाबत त्यांच्या म्हणन्यात नमुद आहे. गैरअर्जदार यांनी या पुर्वीच या पैकी ४७ आर जमिन अर्जदार व त्यांची पत्नी यांचेकडुन दिनांक ०६/०३/२००९ रोजी दोन नोंदणी कृत खरेदीखता द्वारे विहीर, पाईपाइन व ईलेट्रीक मोटार सह खरेदी केलेली आहे. तदनंतर दिनांक २७/०६/२००९ रोजी गैरअर्जदार २ व ३ यांनी पुन्हा याच शिवारातील गट नंबर २०६ मधील ४० आर जमिन श्री. रावसाहेब सोळंके यांच्याकडुन खरेदीखता द्वारे खरेदी केलेली आहे. या खरेदीखता नुसार व चौकशी अंती महसुल विभाग यांनी या शेतजमिनीच्या मालकी हक्कात व ७/१२ उताऱ्यात गैरअर्जदार २ व ३ यांची नोंद घेतली आहे. तेव्हा पासुन गैरअर्जदार ३ हे सदर शेतजमिनीचे मालक व कब्जेदार असून शेतजमिनीचा उपभोग घेत आहे. गतवर्षी अर्जदार यांनी खोडसाळ पणाने गैरअर्जदार यांच्या विरोधात पोलीस स्टेशन सोयगांव येथे त्रास देण्याच्या उद्देशाने खोटी तक्रार दाखल केली आहे. गैरअर्जदार हे गरीब असून अर्जदार हे उद्दट असून त्यांच्या पाठीमागे मोठा जोड जमाव आहे. काही महिण्या पुर्वी श्री. बाळु त्र्यंबक खंडाळे यांनी गैरअर्जदार यांच्या शेतातील बाजरी पिक व इलेक्ट्रीक मोटारची चोरी केल्याने गैरअर्जदार यांनी त्यांचे विरूध्द सोयगांव पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिलेली आहे. तदनंतर गैरअर्जदार यांनी या शेतजमिनीवर अर्जदार यांना मनाई

बाबत सोयगांव येथील मा. दिवाणी न्यायालयात दावा दाखल केलेला होता त्यामध्ये मा. दिवाणी न्यायालय यांनी गैरअर्जदार याच्या बाजुने तात्पुरता मनाई हुकुम दिलेला आहे. तसेच गैरअर्जदार २ व ३ यांनी श्री. विजय नामदेव व अर्जदार यांच्याकडुन जमिन खरेदी केलेली आहे. त्यामध्ये श्री. विजय नामदेव हे सुध्दा शेतजमिनीवर ताब्याचा प्रयत्न करत असल्याने त्यांच्या विरूध्द ही गैरअर्जदार यांनी मा. दिवाणी न्यायालय सोयगांव येथे मनाई हुकुम बाबत दावा दाखल केला असून तो प्रलंबित आहे. अर्जदार यांनी गैरअर्जदार यांच्या विरुध्द खोटी तक्रार दाखल केली असुन या तक्रारीवर सहाय्यक निबंधक, यांनी खोटा अहवाल अर्जदार यांना मदतीच्या उद्देशाने सादर केलेला आहे. चौकशी अधिकारी यांनी गैरअर्जदार यांना पुरावे दाखल करण्यासाठी संधी दिलेली नाही. घाई घाईने खोटा अहवाल सादर केलेला आहे. गैरअर्जदार २ व ३ यांनी सन २००७ मध्ये त्यांचे घोरकुंड शिवारातील शेतजमिन विक्री करून वरठाण येथील शेतजमिन खरेदी केलेली आहे. तसेच गैरअर्जदार १ यांनी सुध्दा घोरकुंड शिवारातील शेतजमिन विक्री करून वरठाण येथे शेतजमिन खरेदी केलेली आहे. त्या शेतजमिनीवर गैरअर्जदार १ यांनी बँकेचे कर्ज घेतलेले आहे. अर्जदार यांनी शेतजमिनीचे नोंदणीकृत खरेदीखत मालमत्ता हस्तांतर कायदाच्या कलम १७ नुसार केलेले आहे. त्यामुळे या प्राधिकरणास हे प्रकरण चालविण्याचा अधिकार नाही. पुरावा कायदयाच्या कलम ९१ नुसार तोंडी पुरावा हा लेखी पुरावाच्या संबंधाने ग्राहय धरता येत नाही. या प्रकरणी अर्जदार व काही लोकांनी त्रास देण्याच्या उद्देशाने गैरअर्जदार यांच्या विरूध्द तक्रारी दाखल केलेल्या आहे. सहाय्यक निबंधक, यांनी त्यांच्या अहवालात नमुद केले आहे की, त्यांनी शेतजमिनीच्या ताब्या बाबत तहसिलदार यांच्याकडुन अहवाल मागविलेला आहे. या प्रकरणी तलाठी यांनी अर्जदारांशी संगनमत करून खोटा अहवाल सादर केलेला आहे. गैरअर्जदार यांचे नाव या शेतजमिनीच्या मालकी हक्कात आहे. तलाठी यांना या बाबत मत मांडण्याचे व अहवाल सादर करण्याचे अधिकार नाही. त्यामुळे त्यांनी सादर केलेला अहवाल खोटा आहे. अर्जदार हे एकाच जमातीचे असून त्यांचा गावामध्ये जोड जमाव आहे. गट नंबर २०६ च्या शेतजमिनी बाबत मा. दिवाणी न्यायालय सोयगांव यांनी तात्पुरता मनाई हुकुम दिलेला आहे. अर्जदार यांनी अर्जात नमुद केले की, त्यांनी गैरअर्जदार १ यांच्याकडुन रक्कम घेऊन ती परत केलेली आहे. या प्रकरणी अर्जदार, श्रीमती लताबाई तसेच श्री. रावसाहेब, श्री. संजय , विजय, सुनिल, आणि श्री. विजय पाटील यांनी खोटी कथा तयार करून या प्रकरणी तक्रारी दाखल केलेल्या आहे. व गैरअर्जदार १ यांचा २ व ३ शी कोणताही संबंध नाही ते फक्त नातलग आहे. गैरअर्जदार १ हे कोणताही सावकारी व्यवसाय करीत नसुन ते शेतकरी आहे. त्यांनी नोंदणीकृत खरेदीखता द्वारे या शेतजमिनी खरेदी केलेल्या आहे. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या विरुध्द ६ वर्षांनी खोटी तक्रार दाखल केलेली आहे. ही बाब विचारात घेऊन अर्जदार यांचा अर्ज फेटाळुन प्रकरण बंद करावे अशी विनंती केलेली आहे.

ज्याअर्थी वाचा क्रमांक ३ नुसार सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. सिल्लोड यांनी अर्जदार यांचे तक्रारीस अनुसरून त्यांचे कार्यालयातील श्री. दिलीप दे. जैस्वाल सहकार अधिकारी श्रेणी-१ यांचा चौकशी अहवाल

त्यांचे सहमतीसह सादर केला आहे. श्री. दिलीप दे. जैस्वाल सहकार अधिकारी श्रेणी-१ यांनी त्यांचे चौकशी अहवालात पुढील प्रमाणे बाबी नमुद केलेल्या आहेत.

या कार्यालयाचे संदर्भ क्रमांक २ चे पत्रानुसार श्री. बालु त्र्यंबक खंडाळे, श्रीमती.लताबाई बालु खंडाळे, श्री.विजय त्र्यंबक खंडाळे व श्री.विजय नामदेव सोळंके व तदनंतर तक्रारदार अर्जदार यांचा तक्रार अर्ज चौकशीस्तव सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता. सिल्लोड यांचे कार्यालयास देऊन त्या बाबत तक्रारदाराला सोबत घेऊन तक्रारीतील नमुद व्यक्तीचे घराची व आवश्यक असल्यास इतर संबंधीत ठिकाणाची झडती घेऊन झडती पुरावे तपासणी करून स्पष्ट अभिप्रायासह चौकशी करून चौकशी अहवाल सादर करण्याच्या सुचना दिलेल्या होत्या. तक्रार अर्जात अर्जदार व इतर यांनी असे नमुद केले आहे की, श्री. बालु त्र्यंबक खंडाळे यांच्या मालकीची गट नंबर २०६ मधील जमिन क्षेत्र २४ आर अर्जदार यांची पत्नी यांची २३ आर व आत्या भाऊ नामे श्री. रावसाहेब रतनसिंग सोळंके यांच्या नावे असलेली गट नंबर २०६ मधील ४० आर जमिन अशी एकून ८७ आर जमिन गैरअर्जदार १ खाजगी सावकार या नात्याने खरेदी केलेली आहे. तसेच श्री. विजय नामदेव सोळंके यांच्या गट नंबर १७४ मधील नावे असलेली ९५ आर जमिन पैकी ५५ आर कायम स्वरूपी खरेदी करून घेतलेली आहे. सदर गैरअर्जदार १ सावकाराने शासकीय दरानुसार सर्वांच्या नियमानुसार सावकारी दाखवुन आम्हा वरील शेतकऱ्यांची मालमत्ता खाजगीत मी परत देईल असे म्हणुन गैरअर्जदार १ सावकारांनी पैसे देतांना आमच्या मालकी हक्काच्या जमिनी खोटे बोलुन कायम स्वरूपी खरेदी करून घेतलेल्या आहे. अर्जदार, त्यांची पत्नी व आत्या भाऊ या तिघे खरेदीदारांची ८७ आर जमिन शासकीय दरानुसार रू. ३,२०,०००/- खरेदी आधारे दाखवुन त्यांची निम्मी रक्कम रू. १,६०,०००/- तिघांच्या खरेदी आधारे अर्जदार यांना दिलेली आहे. सदर गैरअर्जदार १ सावकार खाजगी रित्या पुर्ण पैशाचे व्याज रू. १२,००,०००/- दाखवुन त्यांची फसवनुक केली आहे. सदर गैरअर्जदार १ सावकाराच्या ताब्यात ४० आर जमिन आम्ही खाजगी रित्या ताब्यात दिली होती. सदर गैरअर्जदार १ सावकार जमिन परत खरेदी करून देत नाही. तसेच अर्जदार यांच्या मालकीची मौजे वरठाण शिवारातील गट नंबर १६७ मधील जमिन क्षेत्र १ हेक्टर १३ आर पैकी ७३ आर जमिन शासकीय दरानुसार रू. २,१०,०००/- दाखवुन त्यांची निम्मी रक्कम रू. १,०५,०००/- अर्जदार यांना खरेदी आधारे दिले. अर्जदार यांनी व्याज व मुद्दलासह रू. ४,००,०००/- सावकारास जमा केले तरी गैरअर्जदार १ सावकार खाजगी रित्या केलेली खरेदी परत करून देत नाही. तसेच श्री. विजय नामदेव सोळंके यांच्या मौजे वरठाण शिवारातील मालकी हक्काची जमिन गट नंबर १७४ मधील जमिन क्षेत्र ९५ आर पैकी कायम स्वरूपी खरेदी ५५ आर गैरअर्जदार १ सावकाराने त्यांच्या स्वतःच्या नावाने करून घेतली शासकीय दर रू. १,८६,०००/- दाखवुन गैरअर्जदार १ सावकाराने श्री. विजय नामदेव सोळंके यास रू. ९०,०००/- दिले या रू. ९०,०००/- रकमे पोटी व्याज व मुद्दलासह रू. १,९१,०००/- मध्यस्ती श्री. नंदुसिंह गोविंदसिंह सोळंके यांच्या मध्यस्तीने गैरअर्जदार १ सावकारास दिले. तथापी गैरअर्जदार १ सावकार श्री. विजय नामदेव सोळंके यांच्याकडे रू. ५,००,०००/- मागणी करीत आहे. श्री. विजय

नामदेव सोळंके यांनी करून दिलेली ५५ आर जमिन परतीची खरेदी करून देत नाही. सदर गैरअर्जदार १ सावकाराचे जवळचे नातेवाईक वरठाण येथील गैरअर्जदार २ यांच्या नावे ५५ आर जमिन श्री. विजय नामदेव सोळंके यांची करून घेतलेली आहे. श्री. बालु त्र्यंबक खंडाळे, त्यांची पत्नी व आत्या भाऊ श्री. रावसाहेब रतनसिंग सोळंके यांची एकूण ८७ आर जमिन गैरअर्जदार ३ यांच्या नावाने गैरअर्जदार १ सावकाराने खरेदी करून घेतलेले आहे. गैरअर्जदार १ सावकारांचे मुळ वरठाण येथील घर गैरअर्जदार २ याच्या घरात सर्व सावकारी कागदपत्रक डायरी, चेक बुक, यांच्या घरातील कपाटातच ठेवलेले आहे. ते जप्त करण्यात यावे व गैरअर्जदार १ सावकारा विरूध सावकारी कायदया प्रमाणे गुन्हा दाखल करणे बाबत कार्यवाही व्हावी अशी विनंती केलेली आहे. या अर्जावर अर्जदार तसेच श्री. बालु त्र्यंबक खंडाळे व इतर यांच्या स्वाक्षऱ्या आहे.

उक्त तक्रारीस अनुसरून मुळ तक्रारदार श्री. बालु त्र्यंबक खंडाळे व दुसरे तक्रारदार श्री. सुनिल आनंदा पाटील याचा जवाब दिनांक २२/०७/२०१५ रोजी चौकशी अधिकारी यांनी नोंदविल्या बाबत त्यांचे चौकशी अहवाल नमुद आहे. तदनंतर गैरअर्जदार १ सावकार यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांचे वरठाण येथील राहते घरी दिनांक २१/०८/२०१५ रोजी वाजवी नोटीस देऊन घरझडती चौकशी अधिकारी यांनी घेतलेली आहे. या घरझडतीमध्ये त्यांचे घरातुन चौकशी अधिकारी यांनी पुढील प्रमाणे कागदपत्रे चौकशी कामी ताब्यात घेतली असल्याचे अहवालात नमुद आहे.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD
सत्यमेव जयते
DIST. AURANGABAD

**शेतजमिनीचे खरेदी खत :-**

१. खरेदीखत क्रमांक १००१ दिनांक २७/०७/२००९ गट नंबर २०६ क्षेत्र ४० आर गाव वरठाण लिहुन देणार रावसाहेब रतनसिंग सोळंके व लिहुन घेणार सौ. संगिता सुभाष ठाकरे.
२. खरेदीखत क्रमांक ३६८ दिनांक ०६/०३/२००९ ाट नंबर ३६८ क्षेत्र २३ आर गाव वरठाण लिहुन देणार लताबाई बालु खंडाळे व लिहुन घेणार सौ. संगिता सुभाष ठाकरे.
३. खरेदीखत क्रमांक ३६७ दिनांक ०६/०३/२००९ गट नंबर २०६ क्षेत्र २४ आर गाव वरठाण लिहुन देणार बालु त्र्यंबक खंडाळे व लिहुन घेणार सौ. संगिता सुभाष ठाकरे.
४. खरेदीखत क्रमांक २०५ दिनांक ०७/०२/२००९ गट नंबर १६७ क्षेत्र ७३ आर गाव वरठाण लिहुन देणार विजय त्र्यंबक पाटील व लिहुन घेणार सुभाष बळिराम ठाकरे.
५. **खरेदीखत क्रमांक ३७३ दिनांक ०६/०३/२००९ गट नंबर ६६ क्षेत्र ३०+३४= ६४ आर गाव वरठाण लिहुन देणार सुनिल आनंदा पाटील व लिहुन घेणार सौ. संगिता सुभाष ठाकरे**
६. ख़रेदीखत क्रमांक ९४५ दिनांक २०/०६/२००५ गट नंबर ७१ क्षेत्र ९१ आर गाव घोरकुंड लिहुन देणार शंकर हरिदास केशवाणी व लिहुन घेणार सुभाष बळिराम ठाकरे.
७. खरेदीखत क्रमांक ३७२ दिनांक ०६/०३/२००९ गट नंबर ३९ क्षेत्र ८० आर गाव वरठाण लिहुन देणार संजय रामसिंग सोळंके व लिहुन घेणार चिंतामण नारायण राऊत.
८. खरेदीखत क्रमांक ५५३ दिनांक ०८/०४/२००९ गट नंबर १७४ क्षेत्र ५५ आर गाव वरठाण लिहुन देणार विजय नामदेव सोळंके व लिहुन घेणार चिंतामण नारायण राऊत.

९. खरेदीखत क्रमांक ५३५ दिनांक ०३/०२/१९९६ गट नंबर ७९ क्षेत्र २० आर गाव वरठाण लिहुन देणार भरतसिंग मोहसिंग जाधव व लिहुन घेणार चिंतामण नारायण राऊत.

**बाँड पेपर :-**

१. रू. १०० च्या प्रतिज्ञापत्रावर लिहुन घेतलेला बाँड लिहुन देणार संगिता सुभाष ठाकरे
२. रू. १०० च्या प्रतिज्ञापत्रावर लिहुन घेतलेला बाँड लिहुन देणार शालनबाई राऊत
३. रू. १०० च्या प्रतिज्ञापत्रावर लिहुन घेतलेला बाँड लिहुन देणार शालनबाई राऊत

**बँक पासबुके :-**

१. बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक ६०११०३६२०६१
२. बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक ६००६६२३९३५४
३. बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक २०२३०५०७४८४
४. बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक ४७१४
५. औरंगाबाद जि.म.स.बँक शाखा वरठाण खाते क्रमांक ०००५११००२००२१५६
६. औरंगाबाद जि.म.स.बँक शाखा वरठाण खाते क्रमांक ०००५११००२००३८१६
७. औरंगाबाद जि.म.स.बँक शाखा वरठाण खाते क्रमांक ०००५११००२००८०८५
८. औरंगाबाद जि.म.स.बँक शाखा वरठाण खाते क्रमांक ०००५११००२००२१५७

**धनादेश :-**

१. बँक ऑफ महाराष्ट्र धनादेश क्रमाक ००१६३८ व १६४०
२. औरंगाबाद जि.म.स.बँक शाखा वरठाण धनादेश क्रमांक ४४१२५१ व २१७९०९

**बँक भरणा पावत्या :-**

१. बँक ऑफ महाराष्ट्र दिनांक ०१/०८/२०१३ रू. १,००,०००/-
२. बँक ऑफ महाराष्ट्र दिनांक ०८/०८/२०१३ रू. ८०,,०००/-
३. बँक ऑफ महाराष्ट्र दिनांक २२/०२/२०१३ रू. १५,०००/-
४. बँक ऑफ महाराष्ट्र दिनांक १६/०३/२०११ रू. ५००/-
५. बँक ऑफ महाराष्ट्र दिनांक २६/०३/२०११ रू. २३,९८०/-
६. बँक ऑफ महाराष्ट्र दिनांक १७/११/२०१२ रू. ५०,०००/-
७. बँक ऑफ महाराष्ट्र दिनांक १७/११/२०१२ रू. ३०,०००/-
८. बँक ऑफ महाराष्ट्र दिनांक ०२/०३/२०१२ रू. ८०,०००/-
९. बँक ऑफ महाराष्ट्र दिनांक २२/१२/२०१३ रू. ५०,०००/-
१०. बँक ऑफ महाराष्ट्र दिनांक १२/०३/२०१५ रू. ८२,०००/-
११. बँक ऑफ महाराष्ट्र दिनांक २७/०२/२०१३ रू. २,५५,०००/-
१२. बँक ऑफ महाराष्ट्र दिनांक ०८/०७/२०१३ रू. ५०,०००/-

**दारिद्र्यरेषा प्रमाणपत्र :-** दारिद्र्यरेषा प्रमाणपत्र श्री. सुभाष बळीराम ठाकरे यांचे

१. सुभाष ठाकरे यांचे व उत्पन्नाचे प्रमाणपत्र दिनांक १६/०७/२०१२, ०४/०१/२०११ व ३१/१०/२०१०
२. संजय नामदेव महाले यांनी साध्या कागदावर लिहुन दिलेले पत्र
३. शेतजमिनीचे ७/१२ एकुण संख्या २२
४. छोटी नोंदवही १

५. १०० पेजेस च्या अर्धवट नोंदवहया नोदी असलेल्या २ वहया

वरील प्रमाणे कागदपत्रे ताब्यात घेऊन चौकशी अधिकारी यांनी चौकशीचे कामकाज सुरू करून त्या तक्रारीस अनुसरून तक्रारीतील नमुद तक्रारदारांच्या शेतजमिनी प्रत्यक्ष कोणाच्या ताब्यात आहे या बाबतची माहीती मिळणे बाबत मा. तहसिलदार सोयगांव यांना दिनांक १८/०९/२०१५ च्या पत्रानुसार चौकशी अधिकारी यांनी विनंती केली होती. त्या जमिनीचा गट व क्षेत्रनिहाय तपशिल पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | गट क्रमांक | क्षेत्र | गाव | खरेदीखत करून देणाऱ्याचे नाव | खरेदीखत करून घेणाऱ्याचे नाव | खरेदी खत क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३९ | ८० | वरठाण | संजय रामसिंग सोळंके | चिंतामण नारायण राऊत | ३७२/दि.०६/०३/२००९ |
| २ | ७१ | ९१ | घोरकुंड | शंकर हरिदास केशवाणी | सुभाष बळीराम ठाकरे | ९४५/दि.२०/०६/२००९ |
| ३ | २०६ | २३ | वरठाण | लताबाई बालु खंडाळे | संगिता सुभाष ठाकरे | ३६८/दि.०६/०३/२००९ |
| ४ | २०६ | ४० | वरठाण | रावसाहेब रतनसिंग सोळंके | संगिता सुभाष ठाकरे | १००१/दि.२७/०७/२००९ |
| ५ | २०६ | २४ | वरठाण | बालु त्र्यबंक खंडाळे | संगिता सुभाष ठाकरे | ३६७/दि.०६/०३/२००९ |
| ६ | १६७ | ७३ | वरठाण | विजय त्र्यंबक पाटील | सुभाष बळीराम ठाकरे | २०५/दि.०७/०२/२००९ |
| **७** | **६६** | **३०+३४** | **वरठाण** | **सुनिल आनंदा पाटील** | **संगिता सुभाष ठाकरे** | **३७३/दि.०६/०३/२००९** |
| ८ | ७९ | २० | वरठाण | भरतसिंग मोहनसिंग जाधव | चिंतामण नारायण राऊत | ५३५/दि.०३/०२/१९९६ |
| ९ | ७४ | ५५ | वरठाण | विजय नामदेव सोळंके | चिंतामण नारायण राऊत | ५५३/दि.०८/०४/२००९ |

चौकशीच्या वेळी वरील तक्रारीस अनुसरून प्रस्तुत अर्जदार सुनिल आनंदा पाटील यांनी त्यांचा जवाब रू. १००/- प्रतिज्ञापत्रावर दिनांक ०२/१२/२०१५ रोजी जवाब चौकशी अधिकारी यांचे कडे सादर केला असून त्यांत त्यांनी नमुद केले आहे. की, त्यांनी दिनांक ०३/०६/२०१५ रोजी वेळो वेळी सहकार खात्याकडे गैरअर्जदार १ खाजगी सावकार व त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या विरूध्द अवैध सावकारी बाबत तक्रारी दाखल केलेल्या असुन त्या खऱ्या आहेत. त्यांना भावाच्या आजारपणासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी वरठाण येथील गैरअर्जदार १ खाजगी सावकार ह.मु. श्रीरामपुर यांच्याकडुन रू. १,२०,०००/- ३% व्याजदराने सन २००९ मध्ये घेतलेले होते. या पैशास धर म्हणुन त्यांच्या नावावर असलेली वरठाण शिवारातील गट नंबर ६६ मधील ६४आर शेतजमिन वरठाण येथील गैरअर्जदार १ खाजगी सावकार यांचा भाचा गैरअर्जदार २ यांची पत्नी गैरअर्जदार ३ यांच्या नावाने मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर जमिन वापस देण्याची तोंडी बोली ठेऊन कायम खरेदी खताच्या आधारे लिहुन दिलेली आहे. तदनंतर व्याज वाढत असल्याने हि शेतजमिन त्यांनी विक्री काढली व जमिन विक्री बाबत श्रीमती रत्नाबाई अशोक वाघ यांच्याशी सौदा पावती केली व सौदा पावतीच्या वेळेस रू. १,६५,०००/- रोख घेऊन ही रक्कम सदर गैरअर्जदार १ सावकारास रोखीने दिलेली आहे. सन २०१० ते २०१५ या कालावधीत ही रक्कम रू. १,६५,०००/- धरुन

गैरअर्जदार १ सावकार यांना पुन्हा रू. १,२०,०००/- श्रीमती रत्नाबाई वाघ यांच्याकडुन घेऊन दिलेले आहे. अशा प्रकारे रकमा अदा करूनही गैरअर्जदार १ सावकार शेतजमिन पलटवुन देत नाही. सौदा पावती नंतर शेतजमिन श्रीमती रत्नाबाई अशोक वाघ यांच्या ताब्यात सन २०११ पासुन आहे. शेतजमिनीची उर्वरीत रक्कम रत्नाबाई अशोक वाघ यांच्याकडुन त्यांना सौदा पावती प्रमाणे येणे बाकी आहे. गैरअर्जदार १ सावकार यांच्याशी ज्यावेळी व्यवहार करण्यात आला होता. त्यावेळी या व्यवहारात गावातील पंच श्री. अरूण नवलसिंग शिंदे, श्री. बालु त्र्यंबक खंडाळे, श्री. उमेदसिंग भावसाहेब सोळंके, श्री. प्रकाश सुपडु सुर्यवंशी व श्री. बापु दादा सोळंके हे साक्षीदार असल्याचे त्यांनी जवाबात नमुद केलेले आहे.

वरील तक्रारीस अनुसरून पाचवे तक्रारदार संजय रामसिंग सोळंके यांनी त्यांचा जवाब रू. १००/- प्रतिज्ञापत्रावर दिनांक ११/०१/२०१६ रोजी जवाब चौकशी अधिकारी यांच्या कडे सादर केला असून त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, त्यांनी दिनांक ०३/०६/२०१५ रोजी व वेळोवेळी सहकार खात्याकडे गैरअर्जदार १ ाजगी सावकार व त्याचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या विरूध्द अवैध सावकारी बाबत तक्रारी दाखल केलेल्या असून त्या तक्रारी खऱ्या आहेत. त्यांना आईच्या आजार पणासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी वरठाण येथील गैरअर्जदार १ खाजगी सावकार ह.मु.श्रीरामपुर यांच्या कडुन रू.१,५०,०००/- अक्षरी रूपये एक लाख पन्नास हजार मात्र दमादशे ३% व्याज दराने सन २००९ मध्ये घेतलेले होते. या पैशास धर म्हणुन त्यांच्या नावावर असलेली वरठाण शिवारातील गट नंबर ३९ मधील ६० आर शेतजमिन गैरअर्जदार १ खाजगी सावकार यांच्या नावाने मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर जमिन वापस देण्याच्या तोंडी बोली ठेऊन कायम खरेदीखताच्या आधारे लिहुन दिलेली आहे. सदर व्यवहार हा सावकारी व्यवहार असल्याने शेतजमिन त्यांच्या ताब्यात आहे. त्या शेतजमिनीवर कापूस पिक घेतलेले आहे. आतापर्यंत गैरअर्जदार १ यांना मुद्दल व व्याज मिळुन सन २०१० ते २०१५ या कालावधीत रू.५,२०,०००/- परत केलेले आहे. सदर शेतजमिनीचे खरेदीखत गैरअर्जदार १ सावकार यांनी त्याचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या घरीच ठेवलेले होते.सदर गैरअर्जदार १ सावकार आणखी रू.६,००,०००/- अक्षरी रूपये सहा लाखची मागणी करीत आहे. ती न दिल्यास जमिन परस्पर विक्री करण्याची धमकी देत आहे. गैरअर्जदार १ सावकार व त्यांच्यामध्ये जमिन खरेदीविक्रीचा व्यवहार नसुन व्याजी व्यवहार आहे. त्याबदल्यात जमिन परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर शेतजमिन गैरअर्जदार १ सावकार यांच्या नावावर लिहुन दिलेली आहे या सावकारी व्यवहारात गावातील पाच पंच श्री. उमेदसिंग भाऊसाहेब सोळंके, श्री. बापु दादा सोळंके,श्री. अरूण नवलसिंग शिन्दे ,श्री. प्रेमसिंग गणसिंग शिन्दे, व श्री. बालु त्र्यंबक खंडाळे हे साक्षीदार आहेत. असा शपथपुर्वक जवाब लिहुन दिलेला आहे.

चौकशीच्या वेळी वरील तक्रारीस अनुसरून मुळ तक्रारदार श्री. बालु त्र्यंबक खंडाळे यांनी त्यांचा जवाब रू. १००/- प्रतिज्ञापत्रावर चौकशी अधिकारी यांचेकडे सादर केला असून त्यांत त्यांनी असे नमुद केले आहे की, त्यांनी दिनांक ०३/०६/२०१५ रोजी वेळो वेळी सहकार खात्याकडे गैरअर्जदार १ खाजगी सावकार व त्यांचा हस्तक

गैरअर्जदार २ यांच्या विरूध्द अवैध सावकारी बाबत तक्रारी दाखल केलेल्या असुन त्या खऱ्या आहेत. त्यांना मुलीच्या लग्नासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी वरठाण येथील खाजगी सावकार गैरअर्जदार १ ह.मु. श्रीरामपुर यांच्याकडुन रू. १,६०,०००+८०,००० असे एकूण रू. २,४०,०००/- मात्र ३% व्याजदराने घेतलेले होते. या पैशास धर म्हणुन त्यांच्या नावावर असलेली वरठाण शिवारातील गट नंबर २०६ मधील २४ त्यांचे आर पत्नीच्या नावावरील २३ आर आत्या भावाच्या नावावर असलेली ४० आर अशी एकूण ८७ आर शेतजमिन कुटुंब प्रमुख या नात्याने वरठाण येथील खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांचा भाचा गैरअर्जदार २ यांची पत्नी गैरअर्जदार ३ यांच्या नावाने मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर जमिन वापस देण्याची तोंडी बोली ठेऊन कायम खरेदी खताच्या आधारे गहाण लिहुन दिलेली आहे. सदर व्यवहार सावकारी व्यवहार असल्याने शेतजमिन त्यांच्या ताब्यात आहे. त्या शेतजमिनीवर त्यांनी मुग व कापूस हे दोन पिके घेतलेले आहे. आतापर्यंत त्यांनी मुद्दल व व्याज मिळुन सन २०१० ते २०१५ या कालावधीत गैरअर्जदार १ सावकारास रू. ९,००,०००/- परत केलेले आहे. शेतजमिनीचे खरेदीखत गैरअर्जदार १ सावकार यांनी त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या घरी ठेवलेले होते. गैरअर्जदार १ सावकार आणखी रू. ५,००,०००/- ची मागणी करीत असून ती रक्कम न दिल्यास जमिन परस्पर विकण्याची धमकी देत आहे. गैरअर्जदार १ सावकार व त्याच्यामध्ये जमिन खरेदी विक्रीचा व्यवहार नसुन व्याजी व्यवहार आहे. त्या बदल्यात जमिनी परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर शेतजमिन गैरअर्जदार १ यांचा हस्तक गैरअर्जदार २ च्या पत्नीच्या गैरअर्जदार ३ नावाने लिहुन दिलेली आहे. या सावकारी व्यवहारात गावातील ५ पंच श्री. नंदु बापु सोळंके, श्री. प्रेमसिंग गणसिंग शिंदे, श्री. उमेदसिंग भावसाहेब सोळंके, श्री. प्रकाश सुपडु सुर्यवंशी व श्री. बापु दादा सोळंके हे साक्षीदार असल्याचे त्यांनी जबाबात नमुद केलेले आहे.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD DIST. AURANGABAD सत्यमेव जयते

वरील तक्रारीस अनुसरून दुसरे तक्रारदार श्री. विजय त्र्यंबक पाटील उर्फ खंडाळे रा. वरठाण ता. सोयगांव जि. औरंगाबाद यांनी त्यांचा जवाब रू. १००/- प्रतिज्ञापत्रावर सादर केला असून त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, त्यांनी दिनांक ०३/०६/२०१५ रोजी वेळो वेळी सहकार खात्याकडे खाजगी सावकार श्री. चिंतामण नारायण राऊत रा. वरठाण व त्यांचा हस्तक सुभाष बळीराम ठाकरे यांच्या विरूध्द अवैध सावकारी बाबत तक्रारी दाखल केलेल्या असुन त्या खऱ्या आहेत. त्यांना शेतीच्या कामासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी वरठाण येथील खाजगी सावकार ह.मु. श्रीरामपुर यांच्याकडुन रू. १०५०००/- मात्र ३% व्याजदराने घेतलेले होते. या पैशास धर म्हणुन त्यांच्या नावावर असलेली वरठाण शिवारातील गट नंबर १६७ मधील ७३ आर शेतजमिन खाजगी सावकार यांचा भाचा नामे सुभाष बळीराम ठाकरे यांच्या नावाने मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर जमिन वापस देण्याची तोंडी बोली ठेऊन कायम खरेदी खताच्या आधारे लिहुन दिलेली आहे. सदर व्यवहार सावकारी व्यवहार असल्याने शेतजमिन त्यांच्या ताब्यात आहे. व त्या शेतजमिनीवर त्यांनी केळी व कापूस हे दोन पिके घेतलेले आहे. आतापर्यंत त्यांनी मुद्दल व व्याज मिळुन सन २०१० ते २०१५ या कालावधीत सावकारास रू. ५४३४००/- परत केलेले आहे. सदर शेतजमिनीचे खरेदीखत

सावकार यांनी त्यांचा हस्तक सुभाष बळीराम ठाकरे यांच्या घरी ठेवलेले होते. सदर सावकार आणखी रू. ३०००००/- ची मागणी करीत असून ति रक्कम न दिल्यास जमिन परस्पर विकण्याची धमकी देत आहे. सावकार व त्याच्यामध्ये जमिन खरेदी विक्रीचा व्यवहार नसुन व्याजी व्यवहार आहे व त्या बदल्यात जमिन परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर शेतजमिन त्याच्या हस्तकाच्या पत्नीच्या नावाने लिहुन दिलेली आहे. या सावकारी व्यवहारात गावातील ५ पंच अरून नवलसिंग शिंदे, प्रेमसिंग गणसिंग शिंदे, उमेदसिंग भावसाहेब सोळंके,गणेश धोंडु मिस्तरी व सुरेश सुभाष सोळंके हे साक्षीदार असल्याचे त्यांनी जवाबात नमुद केलेले आहे.

दरम्यान चौकशी अधिकारी यांचे चौकशीच्या वेळी वरील तक्रारीस अनुसरून तिसरे तक्रारदार विजय नामदेव सोळंके यांनी त्यांचा जवाब रू. १००/- प्रतिज्ञापत्रावर चौकशी अधिकारी यांचेकडे दिनांक २२.०९.२०१५ रोजी सादर केला असून त्यांत त्यांनी असे नमुद केले आहे की, त्यांनी दिनांक ०३/०६/२०१५ रोजी व वेळोवेळी सहकार खात्याकडे खाजगी सावकार गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ यांच्या विरूध्द अवैध सावकारी बाबत तक्रारी दाखल केलेल्या असून त्या तक्रारी खऱ्या आहेत. त्यांना शेतीच्या कामासाठी पैशाची गरज पडल्याने त्यांनी वरठाण येथील खाजगी सावकार ह.मु.श्रीरामपुर गैरअर्जदार १ यांच्या कडुन रू.९०,०००/- अक्षरी रूपये नव्वद हजार मात्र दमादशे ३% व्याज दराने सन २००९ मध्ये घेतलेलेहोते. या पैशास धर म्हणुन त्यांच्या नावावर असलेली वरठाण शिवारातील गट नंबर १७४ मधील ५५ आर शेतजमिन खाजगी सावकार गैरअर्जदार १ यांच्या नावाने मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर जमिन वापस देण्याच्या तोंडी बोली ठेऊन कायम खरेदीखताच्या आधारे लिहुन दिलेली आहे. सदर व्यवहार हा सावकारी व्यवहार असल्याने शेतजमिन त्यांचे ताब्यात आहे. त्या शेतजमिनीवर कापूस हे पिके घेतलेली आहे. आतापर्यंत त्यांनी गैरअर्जदार १ यांना मुद्दल व व्याज मिळुन सन २०१० ते २०१५ या कालावधीत रू.१,९५,०००/- परत केलेले आहे. सदर शेतजमिनीचे खरेदीखत सावकार यांनी त्याचा हस्तक गैरअर्जदार २ यांच्या घरीच ठेवलेले होते. सदर सावकार गैरअर्जदार १ हे आनखी रू.२,५०,०००/- अक्षरी रूपये दोन लाख पन्नास हजारची मागणी करीत आहे. ती न दिल्यास जमिन परस्पर विक्री करण्याची धमकी देत आहे. सदर सावकार गैरअर्जदार १ व त्यांच्या मध्ये जमिन खरेदीविक्रीचा व्यवहार नसुन व्याजी व्यवहार आहे. त्याबदल्यात जमिन परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर शेतजमिन गैरअर्जदार ०१ सावकार यांच्या नावावर लिहुन दिलेली आहे या सावकारी व्यवहारात गावातील पाच पंच श्री. अरूण नवलसिंग शिन्दे , श्री. प्रेमसिंग गणसिंग शिन्दे, श्री. उमेदसिंग भावसाहेब सोळुंके, श्री. गणेश धोंडु मिस्तरी व श्री. सुरेश सुभाष सोळुंके हे साक्षीदार आहेत.

या सावकारी व्यवहारातील खरेदी खतावरील साक्षिदार श्री. रावसाहेब रतनसिंग सोळंके यांनी त्यांचा रू. १०० च्या प्रतिज्ञापत्रावर चौकशी अधिकारी यांचे कडे सादर केला असुन त्या जवाबात त्यांनी नमुद केले आहे. की, ते श्री. बालु त्र्यंबक खंडाळे व गैरअर्जदार १ यांच्या सावकारी व्यवहारात साक्षीदार असुन श्री. बालु त्र्यंबक खंडाळे यांनी वरठाण येथील गैरअर्जदार १ खाजगी सावकार यांच्याकडुन एकत्रीत रू. २,४०,०००/- दमदशे ३% दराने सन २००९

MONEYLENDERS ... AURANGABAD

मध्ये घेतलेले होते या पैशास धर म्हणुन त्यांनी त्यांची वरठाण शिवारातील त्यांचे नावे असलेली गट नंबर २०६ मधील ४० आर शेतजमिन श्री. बालु त्र्यंबक खंडाळे यांच्या नावावरील २४ आर व त्यांच्या पत्नीचे नावे असलेली २३ आर जमिन अशी एकूण एकत्र कुटुंबातील ८७ आर जमिन गैरअर्जदार १ यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांची पत्नी गैरअर्जदार ३ हिच्या नावावर परतीच्या बोली प्रमाणे सावकारी व्यवहारात खरेदी करून दिलेली आहे. श्री. बालु त्र्यंबक खंडाळे यांनी त्यांचे पैसे दिलेले असुन श्री. बालु त्र्यंबक खंडाळे यांच्या सांगितल्यावरून त्यांनी शेतजमिन गैरअर्जदार १ सावकाराच्या गैरअर्जदार २ हस्तकाच्या गैरअर्जदार ३ पत्नीच्या नावावर करून दिलेली आहे. श्री. बालु त्र्यंबक खंडाळे यांनी गैरअर्जदार १ सावकाराचे पुर्ण पैसे परत दिले तरी गैरअर्जदार १ सावकार जास्त व्याज मागत आहे. असा जवाब सादर केलेला आहे.

या व्यवहारातील खरेदीखतावरील साक्षीदार श्री. बालु त्र्यंबक खंडाळे यांनी त्यांचा रू. १०० च्या प्रतिज्ञापत्रावर नोटरी समक्ष करून दिलेला दिनांक ०७/१०/२०१५ रोजीचा जवाब सादर केलेला असुन त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते वरठाण येथील रहिवाशी असून व्यवसायाने शेती करीत आहे. त्यांनी गैरअर्जदार १ खाजगी सावकाराकडुन रू.१,६०,०००+८०,०००/- असे एकूण रू. २,४०,०००/- रक्कम दमदशे ३% दराने सन २००९ मध्ये घेतलेले होते. या पैशास धर रहावी म्हणुन त्यांनी त्यांची वरठाण शिवारातील पत्नीच्या नावाने असलेली गट नंबर २०६ मधील २३ आर जमिन स्वतःच्या नावावरील २४ आर व श्री. रावसाहेब रतनसिंग सोळंके यांच्या नावावरील ४० आर अशी एकूण ८७ आर जमिन गैरअर्जदार १ सावकारास खरेदीखत करून दिलेली आहे. सन २००९ ते आजपर्यंत मुद्दल व व्याजासह गैरअर्जदार १ सावकारास रू. ९,००,०००/- दिलेले असून आणखी गैरअर्जदार १ सावकार रू. ५,००,०००/- ची मागणी करीत आहे. जमिनीची खरेदी परतीची बोली असतांनाही खरेदी करून देत नाही. त्यांनी जमिनदार या नात्याने व वरील शेतकऱ्याने केलेला व्यवहार हा कायम स्वरूपी शेतजमीन खरेदीचा नसुन सावकारी व्याजरूपी प्रमाणे व्यवहार आहे असा जवाब दिलेला आहे.

या सावकारी व्यवहारातील खरेदीखतावरील दुसरे साक्षीदार श्री. सुरेश सुभाष सोळंके यांना त्यांचा जवाब दिनांक ०२/१२/२०१५ रोजी जवाब सादर केलेला असुन त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते वरठाण येथील रहिवाशी असून व्यवसायाने शेती करीत आहे. ते श्री. विजय त्र्यंबक खंडाळे व गैरअर्जदार १ यांचे सावकारी व्यवहारात ते साक्षीदार आहे. श्री. विजय त्र्यंबक खंडाळे यांनी गैरअर्जदार १ यांच्याकडुन रू.१,०५,०००/- व्याजाने घेतले होते. व या रकमेस धर रहावी म्हणुन त्यांनी त्यांची वरठाण शिवारातील स्वतःच्या नावाने असलेली गट नंबर १६७ मधील ७३ आर शेतजमिन मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर तोंडी बोली द्वारे जमिन परत पलटवुन देण्याचे ठरले होते. श्री. विजय त्र्यंबक खंडाळे व गैरअर्जदार १ यांच्यात झालेला व्यवहार हा शेतजमिन खरेदी विक्रीचा नसुन सावकारी व्यवहार आहे. व्याजाने घेतलेल्या रकमे पोटी पैशास धर म्हणुन जमिन गैरअर्जदार २ याच्या नावावर लिहुन दिलेले आहे . असा जवाब दिलेला आहे.

या सावकारी व्यवहारातील खरेदीखतावरील तिसरे साक्षीदार श्री. सुनिल आनंदा पाटील यांनी त्यांचा जवाब दिनांक ०२/१२/२०१५ रोजी जवाब सादर केलेला असुन त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते वरठाण येथील रहिवाशी असून व्यवसायाने शेती करीत आहे. ते विजय नामदेव सोळंके व गैरअर्जदार १ यांचे सावकारी व्यवहारात ते साक्षीदार आहे. श्री. विजय नामदेव सोळंके यांनी गैरअर्जदार १ यांच्याकडुन रू.९०,०००/- व्याजाने घेतले होते. व या रकमेस धर रहावी म्हणुन त्यांनी त्यांची वरठाण शिवारातील स्वतःच्या नावाने असलेली गट नंबर १७४ मधील ५५ आर शेतजमिन मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर तोंडी बोली द्वारे जमिन परत पलटवुन देण्याचे ठरले होते. जमिन गैरअर्जदार १ सावकारच्या नावाने लिहुन दिली होती. तथापी जमिन श्री. विजय सोळंके याच्या ताब्यात असून ते त्या जमिनीवर पिक घेत आहे. आज पर्यंत त्यांनी रू.१,९५,०००/- गैरअर्जदार १ सावकारास त्यांच्या समक्ष परत केलेले आहे. असे असतांना गैरअर्जदार १ सावकार जमिन परत पलटवुन देत नाही. श्री. विजय नामदेव सोळंके व गैरअर्जदार १ यांच्यात झालेला व्यवहार जमिन खरेदी विक्रीचा नसुन सावकारी व्यवहार आहे. असा जवाब दिलेला आहे.

या सावकारी व्यवहारातील चौथे साक्षीदार श्री. संजय रामसिंग सोळंके यांनी त्यांचा रू. १०० प्रतिज्ञापत्रावर जवाब सादर केला असून त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते श्री. सुनिल आनंदा पाटील रा. वरठाण व गैरअर्जदार १ यांचे सावकारी व्यवहारात साक्षीदार आहे. श्री सुनिल आनंदा पाटील यांनी गैरअर्जदार १ यांचेकडुन भावाच्या आजार पणासाठी रू. १,२०,०००/- दमदशे ३% व्याजदराने रक्कम घेतली होती. या पैशास धर म्हणुन श्री. सुनिल आनंदा पाटील यांनी त्यांची मौजे वरठाण शिवारातील गट नंबर ६६ मधील ६४ आर शेतजमिन गैरअर्जदार १ खाजगी सावकार यांच्या सांगितल्यानुसार परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर गैरअर्जदार १ सावकार यांचा गैरअर्जदार २ हस्तक यांची गैरअर्जदार ३ पत्नी यांच्या नावाने करून दिलेली आहे. दोघांमध्ये शेतजमिन खरेदी विक्रीचा व्यवहार नाही. शेतजमिन सावकारी व्यवहारात लिहुन दिलेली आहे.

या सावकारी व्यवहारातील पाचवे साक्षीदार श्री. रावसाहेब रतनसिंग सोळंके यांनी त्यांचा रू. १०० प्रतिज्ञापत्रावर जवाब सादर केला असून त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते श्री. संजय रामसिंग सोळंके गैरअर्जदार १ यांचे सावकारी व्यवहारात साक्षीदार आहे. श्री. संजय रामसिंग सोळंके यांनी सन २००९ मध्ये रू. १,५०,०००/- दमदशे ३% व्याज दराने गैरअर्जदार १ खाजगी सावकार कडून घेतले होते. या पैशास जमीन आड म्हणुन परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर खरेदीखत द्वारे लिहुन दिलेली आहे. सदर जमिन गैरअर्जदार १ सावकाराच्या नावाने लिहुन दिलेली आहे. सावकारी व्यवहार असल्याने शेतजमिन श्री. संजय रामसिंग यांच्या ताब्यात आहे. या जमिनीवर ते पिक घेत आहे. आतापर्यंत त्यांनी गैरअर्जदार १ सावकारास रू. ५,२०,०००/- परत करूनही सावकार गैरअर्जदार १ हे त्यांची शेतजमिन पलटवुन देण्याची बोली असुन ही परत पलटवुन देत नाही. दोघात शेतजमिन खरेदी विक्रीचा

व्यवहार नसुन सावकारी व्यवहार आहे. सावकारी व्यवहारात शेतजमिन पैशास धर म्हणुन परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर गैरअर्जदार १सावकाराच्या नावाने लिहुन दिलेली आहे. असा शपथपर जवाब सादर केलेला आहे.

या सावकारी व्यवहारातील सहावे साक्षीदार श्रीमती लताबाई बालु खंडाळे यांनी त्यांचा रू. १०० प्रतिज्ञापत्रावर जवाब सादर केला असून त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, त्या श्री. संजय रामसिंग सोळंके व गैरअर्जदार १ यांचे सावकारी व्यवहारात साक्षीदार आहे. श्री. संजय रामसिंग सोळंके यांनी सन २००९ मध्ये रू. १,५०,०००/- दमदशे ३% व्याज दराने श्री. गैरअर्जदार १ खाजगी सावकार कडून घेतले होते. या पैशास जमीन आड म्हणुन परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर खरेदीखत द्वारे लिहुन दिलेली आहे. सदर जमिन गैरअर्जदार १ सावकाराच्या नावाने लिहुन दिलेली आहे. सावकारी व्यवहार असल्याने शेतजमिन श्री. संजय रामसिंग यांच्या ताब्यात आहे. या जमिनीवर ते पिक घेत आहे. आतापर्यंत त्यांनी गैरअर्जदार १ सावकारास रू. ५,२०,०००/- परत करूनही सावकार गैरअर्जदार १ हे त्यांची शेतजमिन पलटवुन देण्याची बोली असुन ती परत पलटवुन देत नाही. दोघात शेतजमिन खरेदी विक्रीचा व्यवहार नसुन सावकारी व्यवहार आहे. सावकारी व्यवहारात शेतजमिन पैशास धर म्हणुन परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर गैरअर्जदार १ सावकाराच्या नावाने लिहुन दिलेली आहे. असा शपथपर जवाब सादर केलेला आहे.

या सावकारी व्यवहारातील इतर साक्षीदार श्री. बापु दादा सोळंके, श्री. प्रेमसिंग गणसिंग शिंदे श्री. उमेदसिंग भावसाहेब सोळंके हे असुन ते वरठाण येथील महात्मा गांधी तंटामुक्त समिती वरठाणचे पदाधिकारी आहेत. त्यांनी त्यांची सभावृत्तांत माहिती त्यांचे लेटरहेडवर चौकशी अधिकारी यांचेकडे सादर केली असून त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते महात्मा गांधी तंटामुक्त समिती वरठाणचे पदाधिकारी आहे वरठाण येथील रहिवाशी गैरअर्जदार १ हे खाजगी सावकार असुन वरठाण येथील शेतकरी नामे श्री. सुनिल आनंदा पाटील, श्री. बालु त्र्यंबक खंडाळे, श्रीमती लताबाई बालु खंडाळे, श्री. रावसाहेब रतनसिंग सोळंके, श्री. विजय त्र्यंबक खंडाळे, श्री. विजय नामदेव सोळंके व श्री. संजय रामसिंग सोळंके यांच्याशी यांनी सावकारी व्यवहार केलेला असुन या गैरअर्जदार १ खाजगी सावकारी व्यवहारात त्यांनी या शेतकऱ्यांच्या शेतजमिनी स्वतःच्या नावाने व त्यांचा वरठाण येथील हस्तक गैरअर्जदार २ व हस्तकाची पत्नी गैरअर्जदार ३ यांच्या नावाने खरेदीखता आधारे लिहुन घेतलेल्या आहे. व्याजी व्यवहार असल्याने खरेदीखता आधारे लिहुन घेतलेल्या शेतजमिनी शेतकऱ्यांच्या ताब्यात आहे. ते शेतकरी हया शेतजमिनीवर पिक घेत आहे. शेतकरी व गैरअर्जदार १ सावकार यांच्यात घेतलेल्या रकमेवरील व्याजाचा वाद झाल्याने व्यवहार मिटविण्यासाठी गावात तंटामुक्त समितीची बैठक घेण्यात आलेली होती. या बैठकीतही गैरअर्जदार १ सावकार यांनी या शेतकऱ्यांना त्यांच्या मनाप्रमाणे व्याजाची मागणी केलेली होती ती न दिल्यास या शेतकऱ्यांच्या जमिन विकण्यात येईल असेही गैरअर्जदार १ सावकार यांनी बैठकीत सांगितलेले होते. शेतकऱ्यांनी गैरअर्जदार १ सावकारास मुद्दल रकमा व त्यावरील बऱ्याच प्रमाणात व्याजाच्या रकमा अदा केलेल्या आहे. तथापी गैरअर्जदार १ सावकार शेतकऱ्यांना त्यांच्या लिहुन घेतलेल्या शेतजमिनी परत पलटवुन देत नाही. तंटामुक्त समितीच्या बैठकीतुन सदर

व्यवहाराचा वाद मिटलेला नाही. शेतकऱ्यांनी विंनती केल्या नुसार बैठकीची माहिती देत असल्याबाबत पत्रात नमुद आहे. या पत्रावर समितीचे अध्यक्ष श्री उमेदसिंग भाऊसाहेब सोळंके, पदसिंध्द अधिकारी श्री. प्रेमसिंग गणसिंग शिंदे व सदस्य श्री. बापु दादा सोळंके यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

चौकशी अधिकारी यांनी जमिनीच्या ताब्या बाबत माहिती देण्यास विनंती केल्यानुसार मा. तहसिलदार, सोयगांव यांनी त्यांचे पत्र दिनांक १८/१२/२०१५ नुसार तलाठी सजा बनोटी यांच्या मार्फत सविस्तर चौकशी अंती जमिनीच्या ताब्या बाबतचा अहवाल चौकशी अधिकारी यांचेकडे पाठविलेला असल्या बाबत चौकशी अहवालात नमुद आहे. तलाठी यांचे चौकशी अहवालानुसार शेतकऱ्यांच्या ताब्यात असलेल्या जमिन बाबतची माहिती पुढील प्रमाणे आहे.

१. संजय रामसिंग सोळंके गट नंबर ४९ मधील ८० आर जमिन संजय रामसिंग यांच्याच ताब्यात असुन त्यांनी ८० आर मध्ये कापुस हे पिक घेतलेले आहे.
२. लताबाई बालु खंडाळे गट नंबर २०६ मधील २३ आर जमिन लताबाई खंडाळे यांच्याच ताब्यात असुन त्यांनी २३ आर मध्ये कापुस हे पिक घेतलेले आहे.
३. रावसाहेब रतनसिंग सोळंके गट नंबर २०६ मधील ४० आर जमिन रावसाहेब सोळंके यांच्याच ताब्यात असुन त्यांनी ४० आर मध्ये मुग हे पिक घेतलेले आहे.
४. बालु त्र्यंबक खंडाळे गट नंबर २०६ मधील २४ आर जमिन बालु त्र्यंबक खंडाळे यांच्याच ताब्यात असुन त्यांनी २४ आर मध्ये मुग हे पिक घेतलेले आहे.
५. विजय त्र्यंबक पाटील गट नंबर १६७ मधील ७३ आर जमिन विजय त्र्यंबक पाटील यांच्याच ताब्यात असुन त्यांनी ७३ आर मध्ये केळी हे पिक घेतलेले आहे.
६. विजय नामदेव सोळंके गट नंबर १७४ मधील ५५आर जमिन विजय नामदेव सोळंके यांच्याच ताब्यात असुन त्यांनी ५५ आर मध्ये कापूस हे पिक घेतलेले आहे.
७. **सुनिल आनंदा पाटील गट नंबर ६६ मधील ३०+३४ एकूण ६४ आर जमिन त्यांच्या ताब्यात नसुन सदर जमिन सौ. रत्नाबाई अशोक वाघ यांच्या ताब्यात आहे. त्यावर त्यांनी मका हे पिक घेतलेले आहे.**

REGISTRAR OF MONEY LENDERS AURANGABAD

तसेच श्री. भरतसिंग मोहनसिंग जाधव गट नंबर ७९ क्षेत्र २० आर जमिनीची चौकशी केल्यावरून व्यवहार मिटलेला आहे. व श्री. शंकर हरिदास केशवाणी गट नंबर ७१ क्षेत्र ९१ आर हे घोरकुंड शिवारात असल्याने बनोटी सज्जेत येत नसल्याने चौकशी केलेली नाही. वरील १ ते ७ लोकांच्या जमिनी हया गैरअर्जदार १, गैरअर्जदार २ व गैरअर्जदार ३ यांच्या ताब्यात नसल्या बाबत तलाठी यांनी अहवाल सादर केलेला आहे. तलाठी यांनी केलेल्या पंचनाम्यावर शेतजमिनीचे आजुबाजुचे शेतकरी श्री प्रकाश वामन पाटील, श्री. अशोक धनसिंग सोळंके, श्री. अनिल

लोटन खंडाळे, श्री. लोटन किसन खंडाळे, श्री. बारकु धोंडु सोळंके व श्री. बालु त्र्यंबक खंडाळे यांच्या सहया असुन या पंचनाम्यावर पंचलोक म्हणुन श्री. उमेदसिंग भाऊसाहेब सोळंके, तंटामुक्ती अध्यक्ष, श्री. बापु दादा सोळंके, तंटामुक्ती संयोजक, श्री. अरूण नवलसिंग सोळंके, श्री. विठ्ठल यादव भोजने/ श्री. सुर्यवंशी, श्री. नारायण पुंडलीक सोळंके, श्री. भगवान बालु पवार व श्री. सुनिल नाना पाटील यांच्या सहया असुन पंचानाम्यावर तलाठी यांची सही आहे.

चौकशी अहवालानुसार गैरअर्जदार २ यांचे राहते घरी घेतलेल्या घरझडतीत त्यांचे दारिद्रयरेशा खालील प्रमाणपत्र व उत्पन्नाचे प्रमाणपत्र चौकशी कामी चौकशी अधिकारी यांनी ताब्यात घेतलेले आहे. त्यांनुसार गैरअर्जदार २ हे दारिद्रयरेषेखाली आहे. त्यांचे मा.तहसिलदार ,ता.सोयगाव यांनी दिनांक १६.०७.२०१२ रोजी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार त्यांचे सन २०११-१२ या वर्षाचे उत्पन्न रु.३५,०००/- आहे व त्यांना गटविकास अधिकारी पंचायत समिती, सोयगाव, विस्तार अधिकारी सांख्यिकी, पंचायत समिती सोयगाव व ग्रामविकास अधिकारी, वरठाण यांच्या एकत्रित सहीने ते दारीद्ररेषेखाली असल्याबाबत व त्यांचा समावेश अनुक्रमांक ५८ वर झालेला असल्याबाबत सन २००२ ते २००७ या कालावधीसाठी प्रमाणपत्र दिलेले आहे. तक्रारदार यांनी गैरअर्जदार १ सावकार यांच्याशी केलेला व्यवहार हा याच कालावधीतील आहे.

ज्यांच्या विरूध्द अवैध सावकारी संबंधाने तक्रार आहे, ते गैरअर्जदार १, गैरअर्जदार २ व गैरअर्जदार ३ यांच्या वतीने म्हणने मांडण्यासाठी त्यांचे अभियोक्ते श्री. आर.ए.गिरी सोयगांव यांनी वकील पत्र सादर करून त्यांचा खुलासा चौकशी अधिकारी यांचेकडे सादर केलेला आहे. त्यात त्यांनी नमुद केले आहे की, गट नंबर २०६ मधील २४+४०+२३ एकूण ८७ आर जमिन व गट नंबर १४७ मधील ५५ आर जमिन सावकारी व्यवसायात घेतली हे तक्रारदार यांचे म्हणने खोटे आहे. तसेच या जमिनीची रजिष्ट्री परत पलटवुन देण्यात येईल हे अर्जदार यांचे म्हणने खोटे आहे. तसेच गैरअर्जदार १ हे कोणताही सावकारी व्यवहार करीत नसुन त्यांनी अर्जदार यांचे कडुन कोणतेही व्याज घेतलेले नाही. अर्जदार यांनी गैरअर्जदार १ यांना मानसिक त्रास देण्यासाठी तक्रार केलेली आहे व ती तक्रार पुर्णतहा खोटी आहे. गैरअर्जदार १ व गैरअर्जदार २ यांचा कोणताही संबंध नाही. ते नातलग आहे. गैरअर्जदार १ हे अहमदनगर येथे राहत असुन गैरअर्जदार २ हे वरठाण ता. सोयगांव येथे राहतात.गैरअर्जदार २ व त्यांची पत्नी गैरअर्जदार ३ यांनी गट नंबर २०६ मधील ८७ आर जमिन खरेदी केलेली आहे. त्याबाबतचे ७/१२ त्यांनी सोबत जोडलेले आहे. दिनांक ०६/०३/२००९ रोजी ४७ आर जमिन पाईप लाईन व ईलेक्ट्रीक मोटार सह गैरअर्जदार २ व त्यांची पत्नी गैरअर्जदार ३ यांनी अर्जदार व त्यांच्या पत्नीकडुन खरेदी केलेली आहे. तसेच दिनांक २७/०६/२००९ रोजी गैरअर्जदार २ व त्यांची पत्नी गैरअर्जदार ३ यांनी गट नंबर २०६ मधील ४० आर जमिन खरेदीखता द्वारे श्री. रावसाहेब सोळंके यांच्याकडुन खरेदी केलेली आहे खरेदीखता नंतर महसुल विभागाने संबंधीताचे नाव मालकी हक्कात ७/१२ उताऱ्यावर घेतलेले असून तेव्हापासुन गैरअर्जदार ३ व गैरअर्जदार २ हे या जमिनीचा उपभोग घेत

आहे. चालु वर्षी अर्जदार यांनी त्यांचे विरूध्द खोटया तक्रारी पोलीस स्टेशन व इतर ठिकाणी दाखल केलेल्या आहे. गैरअर्जदार १ हे गरीब असुन अर्जदार यांच्या उध्दट स्वभावाने त्यांच्या वतीने गावातील लोक आहेत व १४ दिवसा पुर्वी अर्जदार यांनी बेकायदेशीर पणे शेतातील बाजरी हे पिक व ईलेक्ट्रीक मोटार चोरी केलेले आहे त्या बाबत गैरअर्जदार ३ यांनी सोयगाव पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल केलेला आहे. तसेच गैरअर्जदार ३ व गैरअर्जदार २ यांनी गट नंबर २०६ मधील व इतर जमिन खरेदी केलेली असल्याने तक्रारदार यांचे विरूध्द मनाईहुकम बाबत मा. दिवाणी न्यायालय सोयगांव येथे दावा दाखल केलेला आहे व दिनांक १४/०८/२०१५ रोजी तो मान्य केलेला आहे.

त्यामुळे तक्रारदार यांनी केलेली तक्रार हि खोटी असुन गैरअर्जदार यांना त्रास देण्याच्या उद्देशाने केलेली असुन मुंबई सावकारी अधिनियम १९४६ चे कलम १३(ब) नुसार या कार्यालयास यावर निर्णय देण्याचे अधिकार नसल्याने अर्जदार यांची तक्रार निकाली काढावी अशी विनंती चौकशी अधिकारी यांना केली होती.

उपरोक्त बाबीवरुन अर्जदार यांची तक्रारीतील नमुद गट नंबर मधील शेतजमिन हि अवैध सावकारी व्यवहारात गैरअर्जदार १, गैरअर्जदार २ व गैरअर्जदार ३ यांच्या नावाने प्रतिभुती म्हणुन दिलेली आहे काय? असल्यास चौकशी अंती त्या बाबतचे स्पष्टीकरण काय आहे ? या बाबत चौकशी निष्कर्ष निश्चीत होणे आवश्यक आहे. असा मुद्दा चौकशी अधिकारी यांनी निश्चीत करून त्या बाबत त्यांचे अभिप्राय खालील प्रमाणे चौकशी अहवालात नमुद केले आहे.

चौकशी अधिकारी यांनी चौकशी अंती उपलब्ध पुरावे, तलाठी यांचा ताबा बाबत अहवाल, गैरअर्जदार २ यांचे दारिद्ररेषाखालील प्रमाणपत्र, त्यांचे उत्पन्न प्रमाणपत्र, सापडलेल्या नोंदवहीतील नोंदी साक्षीदार यांचे जाब जवाबानुसार अर्जदार यांची शेतजमिन अवैध सावकारी संबंधाने गैरअर्जदार १ , गैरअर्जदार २ व गैरअर्जदार ३ यांच्या नावाने प्रतिभुती म्हणुन दिलेली आहे हे चौकशी अंती सिध्द होत असल्या बाबत अहवालात नमुद करून त्याबाबतचे अर्जदार निहाय स्पष्टीकरण पुढील प्रमाणे चौकशी अहवालात दिलेले आहे.

१. खरेदी खत क्रमांक ३७२ दिनांक ०६/०३/२००९ गट नंबर ३९ क्षेत्र ८० आर लिहुन देणार श्री.संजय रामसिंग सोळंके लिहुन घेणार गैरअर्जदार १ यांच्यातील व्यवहार हा जमिन खरेदी विक्रीचा नसुन सावकारी व्यवहार आहे. या बाबीस या व्यवहारातील पुढील साक्षदार पुष्टी देत आहे. त्या साक्षदारांचा तपशिल पुढील प्रमाणे.

या सावकारी व्यवहारातील खरेदी खत क्रमांक ३७२ दिनांक ०६/०३/२००९ गट नंबर ३९ क्षेत्र ८० आर वरील साक्षीदार श्री. रावसाहेब रतनसिंग सोळंके यांनी त्यांचा रू. १०० प्रतिज्ञापत्रावर जवाब सादर केला असून त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते श्री. संजय रामसिंग सोळंके गैरअर्जदार १ यांचे सावकारी व्यवहारात साक्षीदार आहे. श्री. संजय रामसिंग सोळंके यांनी सन २००९ मध्ये रू. १,५०,०००/- दमदशे ३% व्याज दराने गैरअर्जदार १ खाजगी सावकार कडून घेतले होते. या पैशास जमीन आड म्हणुन परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर खरेदीखत द्वारे

लिहुन दिलेली आहे. सदर जमिन गैरअर्जदार १ सावकाराच्या नावाने लिहुन दिलेली आहे. सावकारी व्यवहार असल्याने शेतजमिन श्री. संजय रामसिंग यांच्या ताब्यात आहे. व या जमिनीवर ते पिक घेत आहे. आतापर्यंत त्यांनी गैरअर्जदार १ सावकारास रू. ५,२०,०००/- परत करूनही सावकार गैरअर्जदार १ हे त्यांची शेतजमिन पलटवुन देण्याची बोली असुन ही परत पलटवुन देत नाही. दोघात शेतजमिन खरेदी विक्रीचा व्यवहार नसुन सावकारी व्यवहार आहे. सावकारी व्यवहारात शेतजमिन पैशास धर म्हणुन परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर गैरअर्जदार १सावकाराच्या नावाने लिहुन दिलेली आहे. असा शपथपर जवाब सादर केलेला आहे.

या सावकारी व्यवहारातील खरेदी खत क्रमांक ३७२ दिनांक ०६/०३/२००९ गट नंबर ३९ क्षेत्र ८० आर वरील साक्षीदार श्रीमती लताबाई बालु खंडाळे यांनी त्यांचा रू. १०० प्रतिज्ञापत्रावर जवाब सादर केला असून त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, त्या श्री. संजय रामसिंग सोळंके व गैरअर्जदार १ यांचे सावकारी व्यवहारात साक्षीदार आहे. श्री. संजय रामसिंग सोळंके यांनी सन २००९ मध्ये रू. १,५०,०००/- दमदशे ३% व्याज दराने श्री. गैरअर्जदार १ खाजगी सावकार कडून घेतले होते. या पैशास जमीन आड म्हणुन परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर खरेदीखत द्वारे लिहुन दिलेली आहे. ही जमिन गैरअर्जदार १ सावकाराच्या नावाने लिहुन दिलेली आहे. सावकारी व्यवहार असल्याने शेतजमिन श्री. संजय रामसिंग यांच्या ताब्यात आहे. या जमिनीवर ते पिक घेत आहे. आतापर्यंत त्यांनी गैरअर्जदार १ सावकारास रू. ५,२०,०००/- परत करूनही सावकार गैरअर्जदार १ हे त्यांची शेतजमिन पलटवुन देण्याची बोली असुन ही परत पलटवुन देत नाही. दोघात शेतजमिन खरेदी विक्रीचा व्यवहार नसुन सावकारी व्यवहार आहे. सावकारी व्यवहारात शेतजमिन पैशास धर म्हणुन परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर गैरअर्जदार १ सावकाराच्या नावाने लिहुन दिलेली आहे. असा शपथपर जवाब सादर केलेला आहे.

तसेच तलाठी यांचे जमिनीचे ताबे बाबतचा अहवालानुसार सदर शेतजमिन तक्रारदार यांचे ताब्यात आहे.

खरेदी खत क्रमांक ३६८ दिनांक ०६/०३/२००९ गट नंबर २०६ मधील क्षेत्र २३ आर लिहुन देणार श्रीमती. लताबाई बालु खंडाळे लिहुन घेणार गैरअर्जदार ३, खरेदी खत क्रमांक १००१ दिनांक २७/०७/२००९ गट नंबर २०६ मधील क्षेत्र ४० आर लिहुन देणार श्री.रावसाहेब रतनसिंग सोळंके लिहुन घेणार गैरअर्जदार ३ व खरेदीखत क्रमांक ३६७ दिनांक ०६/०३/२००९ गट नंबर २०६ मधील क्षेत्र २४ आर लिहुन देणार अर्जदार लिहुन घेणार गैरअर्जदार ३ या गट नंबर मधील एकूण क्षेत्र ८७ आर जमिन एकत्रीत कुटुंब प्रमुख म्हणुन अर्जदार व गैरअर्जदार १ यांच्यातील व्यवहार हा जमिन खरेदी विक्रीचा नसुन सावकारी व्यवहार आहे. व या सावकारी व्यवहारात शेतजमिन ही गैरअर्जदार १ सावकार यांचे सुचनेनुसार त्यांचे हस्तक गैरअर्जदार २ यांची पत्नी गैरअर्जदार ३ यांच्या नावाने लिहुन दिलेली आहे. या बाबीस या व्यवहारातील पुढील साक्षदार पुष्टी देत आहे. त्या साक्षदारांचा तपशिल पुढील प्रमाणे.

या सावकारी व्यवहारातील खरेदी खत क्रमांक ३६८ दिनांक ०६/०३/२००९ गट नंबर २०६ मधील क्षेत्र २३ आर वरील साक्षीदार श्री. बालु त्र्यंबक खंडाळे यांनी त्यांचा रू. १०० च्या प्रतिज्ञापत्रावर नोटरी समक्ष करून दिलेला दिनांक ०७/१०/२०१५ रोजीचा जवाब सादर केलेला असुन त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते वरठाण येथील रहिवाशी असून व्यवसायाने शेती करीत आहे. ते अर्जदार यांची पत्नी यांनी गैरअर्जदार १ खाजगी सावकाराकडुन रू.१,६०,०००+८०,०००/- असे एकुण रू. २,४०,०००/- रक्कम दमदशे ३% दराने सन २००९ मध्ये घेतलेले होते. या पैशास धर रहावी म्हणुन त्यांनी त्यांची वरठाण शिवारातील स्वतःच्या नावाने असलेली गट नंबर २०६ मधील २३ आर जमिन अर्जदार यांच्या नावावरील २४ आर श्री. रावसाहेब रतनसिंग सोळंके यांच्या नावावरील ४० आर अशी एकूण ८७ आर जमिन गैरअर्जदार १ सावकारास खरेदीखत करून दिलेली आहे. सन २००९ ते आजपर्यंत मुद्दल व व्याजासह गैरअर्जदार १ सावकारास रू. ९,००,०००/- दिलेले असून आणखी गैरअर्जदार १ सावकार रू. ५,००,०००/- ची मागणी करीत आहे. जमिनीची खरेदी परतीची बोली असतांनाही खरेदी करून देत नाही. त्यांनी जमिनदार या नात्याने व वरील शेतकऱ्याने केलेला व्यवहार हा कायम स्वरूपी शेतजमीन खरेदीचा नसुन सावकारी व्याजरूपी प्रमाणे व्यवहार आहे असा जवाब दिलेला आहे.

श्री. रावसाहेब रतनसिंग सोळंके यांनी त्यांचा रू. १०० च्या प्रतिज्ञापत्रावर चौकशी अधिकारी यांचे कडे सादर केला असुन त्या जवाबात त्यांनी नमुद केले आहे. की, ते अर्जदार व गैरअर्जदार १ यांच्या सावकारी व्यवहारात खरेदी खत क्रमांक ३६८ दिनांक ०६/०३/२००९ गट नंबर २०६ मधील क्षेत्र २३ आर वरील साक्षीदार असुन अर्जदार यांनी वरठाण येथील गैरअर्जदार १ खाजगी सावकार यांच्याकडुन एकत्रीत रू. २,४०,०००/- दमदशे ३% दराने सन २००९ मध्ये घेतलेले होते या पैशास धर म्हणुन त्यांनी त्यांची वरठाण शिवारातील त्यांचे नावे असलेली गट नंबर २०६ मधील ४० आर शेतजमिन अर्जदार यांच्या नावावरील २४ आर व त्यांच्या पत्नीचे नावे असलेली २३ आर जमिन अशी एकूण एकत्र कुटुंबातील ८७ आर जमिन गैरअर्जदार १ यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांची पत्नी गैरअर्जदार ३ हिच्या नावावर परतीच्या बोली प्रमाणे सावकारी व्यवहारात खरेदी करून दिलेली आहे. अर्जदार यांनी त्यांचे पैसे दिलेले असुन अर्जदार यांच्या सांगितल्यावरून त्यांनी शेतजमिन गैरअर्जदार १ सावकाराच्या गैरअर्जदार २ हस्तकाच्या गैरअर्जदार ३पत्नीच्या नावावर करून दिलेली आहे. अर्जदार यांनी गैरअर्जदार १ सावकाराचे पुर्ण पैसे परत दिले तरी गैरअर्जदार १ सावकार जास्त व्याज मागत आहे. असा जवाब सादर केलेला आहे.

तसेच तलाठी यांचे जमिनीचे ताबे बाबतचा अहवालानुसार सदर शेतजमिन तक्रारदार यांचे ताब्यात आहे.

३. खरेदी खत क्रमांक २०५ दिनांक ०७/०२/२००९ गट नंबर १६७ क्षेत्र ७३ आर लिहुन देणार श्री.विजय त्रिंबक पाटील लिहुन घेणार गैरअर्जदार २ यांच्यातील व्यवहार हा जमिन खरेदी विक्रीचा नसुन हा व्यवहार श्री. विजय त्रिंबक पाटील व गैरअर्जदार १ यांच्यातील सावकारी व्यवहार आहे. व या व्यवहारात तक्रारदार यांनी शेतजमिन गैरअर्जदार १ सावकार यांच्या सांगितल्यानुसार शेतजमिन त्यांचा

हस्तक गैरअर्जदार २ यांच्या नावाने लिहुन दिलेली आहे. या बाबीस या व्यवहारातील पुढील साक्षदार पुष्टी देत आहे. त्या साक्षदारांचा तपशिल पुढील प्रमाणे.

या सावकारी व्यवहारातील खरेदी खत क्रमांक २०५ दिनांक ०७/०२/२००९ गट नंबर १६७ क्षेत्र ७३ आर वरील साक्षीदार श्री. सुरेश सुभाष सोळंके यांना त्यांचा जवाब दिनांक ०२/१२/२०१५ रोजी जवाब सादर केलेला असुन त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते वरठाण येथील रहिवाशी असून व्यवसायाने शेती करीत आहे. ते श्री. विजय त्र्यंबक खंडाळे व गैरअर्जदार १ यांचे सावकारी व्यवहारात ते साक्षीदार आहे. श्री. विजय त्र्यंबक खंडाळे यांनी गैरअर्जदार १ यांच्याकडुन रू.१,०५,०००/- व्याजाने घेतले होते. व या रकमेस धर रहावी म्हणुन त्यांनी त्यांची वरठाण शिवारातील स्वतःच्या नावाने असलेली गट नंबर १६७ मधील ७३ आर शेतजमिन मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर तोंडी बोली द्वारे जमिन परत पलटवुन देण्याचे ठरले होते. श्री. विजय त्र्यंबक खंडाळे व गैरअर्जदार १ यांच्यात झालेला व्यवहार हा शेतजमिन खरेदी विक्रीचा नसुन सावकारी व्यवहार आहे. व्याजाने घेतलेल्या रकमे पोटी पैशास धर म्हणुन जमिन गैरअर्जदार २ याच्या नावावर लिहुन दिलेले आहे . असा जवाब दिलेला आहे.

तसेच तलाठी यांचे जमिनीचे ताबे बाबतचा अहवालानुसार सदर शेतजमिन तक्रारदार यांचे ताब्यात आहे.

४. खरेदी खत क्रमांक ३७३ दिनांक ०६/०३/२००९ गट नंबर ६६ क्षेत्र ६४ आर लिहुन देणार श्री.सुनिल आनंदा पाटील लिहुन घेणार गैरअर्जदार ३ यांच्यातील व्यवहार हा जमिन खरेदी विक्रीचा नसुन हा व्यवहार श्री. सुनिल आनंदा पाटील व गैरअर्जदार १ यांच्यातील सावकारी व्यवहार आहे. या व्यवहारात तक्रारदार यांनी शेतजमिन गैरअर्जदार १ सावकार यांच्या सांगितल्यानुसार शेतजमिन त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांची पत्नी गैरअर्जदार ३ यांच्या नावाने लिहुन दिलेली आहे. या बाबीस या व्यवहारातील पुढील साक्षदार पुष्टी देत आहे. त्या साक्षदारांचा तपशिल पुढील प्रमाणे.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD ★ AURANGABAD

या सावकारी व्यवहारातील खरेदी खत क्रमांक ३७३ दिनांक ०६/०३/२००९ गट नंबर ६६ क्षेत्र ६४ आर वरील साक्षीदार श्री. संजय रामसिंग सोळंके यांनी त्यांचा रू. १०० प्रतिज्ञापत्रावर जवाब सादर केला असून त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते श्री. सुनिल आनंदा पाटील रा. वरठाण व गैरअर्जदार १ यांचे सावकारी व्यवहारात साक्षीदार आहे. श्री सुनिल आनंदा पाटील यांनी गैरअर्जदार १ यांचेकडुन भावाच्या आजार पणासाठी रू. १,२०,०००/- दमदशे ३% व्याजदराने रक्कम घेतली होती. व या पैशास धर म्हणुन श्री. सुनिल आनंदा पाटील यांनी त्यांची मौजे वरठाण शिवारातील गट नंबर ६६ मधील ६४ आर शेतजमिन गैरअर्जदार १ खाजगी सावकार यांच्या सांगितल्यानुसार परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर गैरअर्जदार १ सावकार यांचा गैरअर्जदार २ हस्तक यांची गैरअर्जदार ३पत्नी यांच्या नावाने करून दिलेली आहे. दोघांमध्ये शेतजमिन खरेदी विक्रीचा व्यवहार नाही. शेतजमिन सावकारी व्यवहारात लिहुन दिलेली आहे.

तसेच तलाठी यांचे जमिनीचे ताबे बाबतचा अहवालानुसार सदर शेतजमिन तक्रारदार यांचेच ताब्यात आहे.

५. खरेदी खत क्रमांक ५५३ दिनांक ०८/०४/२००९ गट नंबर १७४ क्षेत्र ५५ आर लिहुन देणार श्री. विजय नामदेव सोळंके लिहुन घेणार गैरअर्जदार १ यांच्यातील व्यवहार हा जमिन खरेदी विक्रीचा नसुन हा व्यवहार सावकारी व्यवहार आहे. या बाबीस या व्यवहारातील पुढील साक्षदार पुष्टी देत आहे. त्या साक्षदारांचा तपशिल पुढील प्रमाणे.

या सावकारी व्यवहारातील खरेदी खत क्रमांक ५५३ दिनांक ०८/०४/२००९ गट नंबर १७४ क्षेत्र ५५ आर वरील साक्षीदार श्री. सुनिल आनंदा पाटील यांनी त्यांचा जवाब दिनांक ०२/१२/२०१५ रोजी जवाब सादर केलेला असुन त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते वरठाण येथील रहिवाशी असून व्यवसायाने शेती करीत आहे. ते विजय नामदेव सोळंके व गैरअर्जदार १ यांचे सावकारी व्यवहारात ते साक्षीदार आहे. श्री. विजय नामदेव सोळंके यांनी गैरअर्जदार १ यांच्याकडुन रू.९०,०००/- व्याजाने घेतले होते. या रकमेस धर रहावी म्हणुन त्यांनी त्यांची वरठाण शिवारातील स्वतःच्या नावाने असलेली गट नंबर १७४ मधील ५५ आर शेतजमिन मुद्दल व व्याजाची परत फेड झाल्यावर तोंडी बोली द्वारे जमिन परत पलटवुन देण्याचे ठरले होते व जमिन गैरअर्जदार १ सावकारच्या नावाने लिहुन दिली होती. जमिन श्री. विजय सोळंके याच्या ताब्यात असून ते त्या जमिनीवर पिक घेत आहे. आज पर्यंत त्यांनी रू.१,९५,०००/- गैरअर्जदार १ सावकारास त्यांच्या समक्ष परत केलेले आहे. असे असतांना गैरअर्जदार १ सावकार जमिन परत पलटवुन देत नाही. श्री. विजय नामदेव सोळंके व गैरअर्जदार १ यांच्यात झालेला व्यवहार जमिन खरेदी विक्रीचा नसुन सावकारी व्यवहार आहे. असा जवाब दिलेला आहे.

तसेच तलाठी यांचे जमिनीचे ताबे बाबतचा अहवालानुसार सदर शेतजमिन तक्रारदार यांचेच ताब्यात आहे.

या सावकारी व्यवहारातील इतर साक्षीदार श्री. बापु दादा सोळंके, श्री. प्रेमसिंग गणसिंग शिंदे व श्री. उमेदसिंग भावसाहेब सोळंके हे असुन ते वरठाण येथील महात्मा गांधी तंटामुक्त समिती वरठाणचे पदाधिकारी आहेत. त्यांनी त्यांची सभावृत्तांत माहिती त्यांचे लेटरहेडवर चौकशी अधिकारी यांचेकडे सादर केली असून त्यांत त्यांनी नमुद केले आहे की, ते महात्मा गांधी तंटामुक्त समिती वरठाणचे पदाधिकारी आहे वरठाण येथील रहिवाशी गैरअर्जदार १ हे खाजगी सावकार असुन वरठाण येथील शेतकरी नामे श्री. सुनिल आनंदा पाटील, श्री. बालु त्र्यंबक खंडाळे, श्रीमती लताबाई बालु खंडाळे, श्री. रावसाहेब रतनसिंग सोळंके, श्री. विजय त्र्यंबक खंडाळे, श्री. विजय नामदेव सोळंके व श्री. संजय रामसिंग सोळंके यांच्याशी सावकारी व्यवहार केलेला असुन या गैरअर्जदार १ खाजगी सावकारी व्यवहारात त्यांनी या शेतकऱ्यांच्या शेतजमिनी स्वतःच्या नावाने व त्यांचा वरठाण येथील हस्तक गैरअर्जदार २ व हस्तकाची पत्नी गैरअर्जदार ३ यांच्या नावाने खरेदीखता आधारे लिहुन घेतलेल्या आहे. व्याजी व्यवहार असल्याने खरेदीखता आधारे लिहुन घेतलेल्या शेतजमिनी शेतकऱ्यांच्या ताब्यात आहे. व ते शेतकरी हया शेतजमिनीवर पिक घेत आहे. शेतकरी व गैरअर्जदार १ सावकार यांच्यात घेतलेल्या रकमेवरील व्याजाचा वाद झाल्याने व्यवहार मिटविण्यासाठी गावात तंटामुक्त समितीची बैठक घेण्यात आलेली होती. या बैठकीतही गैरअर्जदार १ सावकार यांनी या शेतकऱ्यांना

त्यांच्या मनाप्रमाणे व्याजाची मागणी केलेली होती ती न दिल्यास या शेतकऱ्यांच्या जमिन विकण्यात येईल असेही गैरअर्जदार १ सावकार यांनी बैठकीत सांगितलेले होते. शेतकऱ्यांनी गैरअर्जदार १ सावकारास मुद्दल रकमा व त्यावरील बऱ्याच प्रमाणात व्याजाच्या रकमा अदा केलेल्या आहे. तथापी गैरअर्जदार १ सावकार शेतकऱ्यांना त्यांच्या लिहुन घेतलेल्या शेतजमिनी परत पलटवुन देत नाही. तंटामुक्त समितीच्या बैठकीतुन सदर व्यवहाराचा वाद मिटलेला नाही.शेतकऱ्यांनी विंनती केल्या नुसार बैठकीची माहिती देत असल्याबाबत पत्रात नमुद आहे. या पत्रावर समितीचे अध्यक्ष श्री उमेदसिंग भाऊसाहेब सोळंके, पदसिंध्द अधिकारी श्री. प्रेमसिंग गणसिंग शिंदे व सदस्य श्री. बापु दादा सोळंके यांच्या स्वाक्षऱ्या आहे.

या प्रकरणात मा. तहसिलदार, सोयगांव यांनी त्यांचे पत्र दिनांक १८/१२/२०१५ नुसार तलाठी सजा बनोटी यांच्या मार्फत सविस्तर चौकशी अंती जमिनीच्या ताब्या बाबतचा अहवाल चौकशी अधिकारी यांचेकडे पाठविलेला असल्या बाबत चौकशी अहवालात नमुद आहे. तलाठी यांचे चौकशी अहवालानुसार शेतकऱ्यांच्या ताब्यात असलेल्या जमिन बाबतची माहिती पुढील प्रमाणे आहे.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD DIST. AURANGABAD

१. संजय रामसिंग सोळंके गट नंबर ४९ मधील ८० आर जमिन संजय रामसिंग यांच्याच ताब्यात असुन त्यांनी ८० आर मध्ये कापुस हे पिक घेतलेले आहे.

२. लताबाई बालु खंडाळे गट नंबर २०६ मधील २३ आर जमिन लताबाई खंडाळे यांच्याच ताब्यात असुन त्यांनी २३ आर मध्ये कापुस हे पिक घेतलेले आहे.

३. रावसाहेब रतनसिंग सोळंके गट नंबर २०६ मधील ४० आर जमिन रावसाहेब सोळंके यांच्याच ताब्यात असुन त्यांनी ४० आर मध्ये मुग हे पिक घेतलेले आहे.

४. बालु त्र्यंबक खंडाळे गट नंबर २०६ मधील २४ आर जमिन बालु त्र्यंबक खंडाळे यांच्याच ताब्यात असुन त्यांनी २४ आर मध्ये मुग हे पिक घेतलेले आहे.

५. विजय त्र्यंबक पाटील गट नंबर १६७ मधील ७३ आर जमिन विजय त्र्यंबक पाटील यांच्याच ताब्यात असुन त्यांनी ७३ आर मध्ये केळी हे पिक घेतलेले आहे.

६. विजय नामदेव सोळंके गट नंबर १७४ मधील ५५आर जमिन विजय नामदेव सोळंके यांच्याच ताब्यात असुन त्यांनी ५५ आर मध्ये कापूस हे पिक घेतलेले आहे.

**७. सुनिल आनंदा पाटील गट नंबर ६६ मधील ३०+३४ एकूण ६४ आर जमिन त्यांच्या ताब्यात नसुन सदर जमिन सौ. रत्नाबाई अशोक वाघ यांच्या ताब्यात आहे व त्यावर त्यांनी मका हे पिक घेतलेले आहे.**

तसेच श्री. भरतसिंग मोहनसिंग जाधव गट नंबर ७९ क्षेत्र २० आर जमिनीची चौकशी केल्यावरून व्यवहार मिटलेला आहे. वरील १ ते ७ लोकांच्या जमिनी हया गैरअर्जदार १, गैरअर्जदार २ व गैरअर्जदार ३ यांच्या ताब्यात नसल्या बाबत तलाठी यांनी अहवाल सादर केलेला आहे. तलाठी यांनी केलेल्या पंचनाम्यावर शेतजमिनीचे आजुबाजुचे शेतकरी श्री प्रकाश वामन पाटील, श्री. अशोक धनसिंग सोळंके, श्री. अनिल लोटन खंडाळे, श्री. लोटन किसन खंडाळे, श्री. बारकु धोंडु सोळंके व श्री. बालु त्र्यंबक खंडाळे यांच्या सहया असुन या पंचनाम्यावर पंचलोक म्हणुन श्री. उमेदसिंग भाऊसाहेब सोळंके, तंटामुक्ती अध्यक्ष, श्री. बापु दादा सोळंके, तंटामुक्ती संयोजक, श्री. अरूण नवलसिंग सोळंके, श्री. विठ्ठल यादव भोजने/ श्री. सुर्यवंशी, श्री. नारायण पुंडलीक सोळंके, श्री. भगवान बालु पवार व श्री. सुनिल नाना पाटील यांच्या सहया असुन पंचानाम्यावर तलाठी यांची सही आहे.

यानुसार श्री. सुनिल आनंदा पाटील यांची जमिन वगळता सर्व शेतजमिनी या अर्जदार शेतकरी यांच्या ताब्यात असल्याचे दिसुन येत आहे. श्री. सुनिल आनंदा पाटील यांची शेतजमिन ही गैरअर्जदार १ सावकाराच्या ताब्यात नसुन ती शेतजमिन श्रीमती रत्नाबाई अशोक वाघ यांच्या ताब्यात आहे. त्यामुळे उपरोक्त नमुद साक्षदार, तंटामुक्त समितीचा अहवाल हे पाहता गैरअर्जदार १ यांनी अवैध सावकारीत अर्जदार यांची शेतजमिन प्रतिभुती म्हणुन घेतली या बाबीस पुष्टी देत आहे. तालाठी यांचे अहवालानुसार शेतजमिन अर्जदार यांचे ताब्यात आहे. शेतजमिन खरेदीविक्रीचा व्यवहार असल्यास शेतजमिनीचा ताबा हा अर्जदार यांचेकडे राहण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. या ठिकाणी शेतजमिनीचा ताबा हा अर्जदार यांचेकडे असल्याने ही बाब अवैध सावकारी व्यवहारास पुष्टी देणारी आहे. असे चौकशी अधिकारी यांनी चौकशी अहवाला नमुद केलेले आहे.

चौकशी अहवालात नमुद आहे की, गैरअर्जदार २ यांचे राहते घरी घेतलेल्या घरझडतीत त्यांचे दारिद्रयरेषेखालीलचे प्रमाणपत्र व उत्पन्नाचे प्रमाणपत्र चौकशी कामी चौकशी अधिकारी यांनी ताब्यात घेतलेले आहे. त्यानुसार गैरअर्जदार २ यांना दिनांक १६/०७/२०१२ रोजी मा. तहसिलदार सोयगांव यांनी त्यांना उत्पन्नाचे प्रमाणपत्र दिलेले असून त्यानुसार त्यांचे सन २०११-२०१२ या वर्षाचे वार्षिक उत्पन्न रू.३५०००/- मात्र आहे. तसेच ग्रामपंचायतचे ग्रामसेवक यांनी दिनांक ०३/१०/२०१० रोजी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार ते सन २००२ ते २००७ चे दारिद्रयरेषेखालील यादित असल्याचे लिहुन दिलेले आहे. तसेच गट विकास अधिकारी पंचायतसमिती सोयगांव ,विस्तार अधिकारी सांख्यिकी पंचायतसमिती सोयगांव व ग्रामविकास अधिकारी वरठाण यांच्या एकत्रीत सहीने ते दारिद्रयरेषेखालील असल्या बाबत प्रमाणपत्र दिलेले असून त्यांचा समावेश अ.क्र.५८ वर झालेला असल्या बाबत प्रमाणपत्रात नमुद आहे . तक्रारदार यांनी अवैध सावकारीत लिहुन दिलेली वरील नमुद तक्रारदार यांचे शेतजमिनीचे खरेदीखत हे याच कालावधीतील आहे . या कालावधीत गैरअर्जदार २ हे दारीद्ररेषेत असल्याचे सकृत दर्शनी दिसुन येते त्यामुळे या व्यवहारात गैरअर्जदार २ हे गैरअर्जदार १ सावकाराचे हस्तक म्हणुन त्यांचे नावाने सदरची सावकारी त्यांचे नावावर जमिनी गहाण घेऊन कामकरीत असल्याचे दिसुन येते असे चौकशी अहवालात नमुद आहे.

२३,९८०/-, दिनांक २२/१२/२०१२ रोजी रू. ५०,०००/-, दिनांक २७/०२/२०१३ रोजी रू. १,५५,०००/-,दिनांक १२/०३/२०१५ रोजी रू. ८२,०००/- व दिनांक ०८/०७/२०१३ रोजी रू. ५०,०००/- जमा केलेल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे त्यांनी त्यांचे अभियोक्ते यांच्या मार्फत दाखल केलेल्या खुलाशास सहमती देता येत नाही. त्यामुळे ही शेतजमिन त्यांनी खरेदी केली नसल्याचे सिध्द होत आहे. या अवैध सावकारी व्यवसायात गैरअर्जदार २ व त्यांची पत्नी गैरअर्जदार ३ हे गैरअर्जदार १ यांचे हस्तक म्हणुन कामकाज करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे असे चौकशी अहवालात नमुद करून चौकशी अंती अर्जदार यांनी केलेल्या तक्रारीत पुर्णतः तथ्य आढळुन आलेले असल्याने या प्रकरणी पुढील प्रमाणे चौकशी निष्कर्ष चौकशी अहवालात दिलेला आहे.

चौकशी अधिकारी यांनी चौकशी अंती खालील नमुद खरेदी खत करुन देणारे ०५ शेतकरी यांनी अवैध सावकारी अंतर्गत व्याजाने पैसे घेवुन या पैशास धर म्हणुन खालील तक्त्यात नमुद केलेली ०७ खरेदी खतातील शेतजमिन अवैध सावकार गैरअर्जदार १ त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ व त्यांची पत्नी गैरअर्जदार ३ यांच्या नावाने प्रतिभुती म्हणुन नोंदणीकृत खरेदी खताव्दारे लिहुन दिलेली आहे.

| अ.क्र. | गट क्रमांक | क्षेत्र | गाव | खरेदीखत करून देणाऱ्याचे नाव | खरेदीखत करून घेणाऱ्याचे नाव | खरेदी खत क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३९ | ८० | वरठाण | संजय रामसिंग सोळंके | चिंतामण नारायण राऊत | ३७२/दि.०६/०३/२००९ |
| २ | २०६ | २३ | वरठाण | लताबाई बालु खंडाळे | संगिता सुभाष ठाकरे | ३६८/दि.०६/०३/२००९ |
| | | ४० | | रावसाहेब रतनसिंग सोळंके | संगिता सुभाष ठाकरे | १००१/दि.२७/०७/२००९ |
| | | २४ | | बालु त्र्यंबक खंडाळे | संगिता सुभाष ठाकरे | ३६७/दि.०६/०३/२००९ |
| ३ | १६७ | ७३ | वरठाण | विजय त्र्यंबक पाटील | सुभाष बळीराम ठाकरे | २०५/दि.०७/०२/२००९ |
| **४** | **६६** | **३०+३४** | **वरठाण** | **सुनिल आनंदा पाटील** | **संगिता सुभाष ठाकरे** | **३७३/दि.०६/०३/२००९** |
| ५ | १७४ | ५५ | वरठाण | विजय नामदेव सोळंके | चिंतामण नारायण राऊत | ५५३/दि.०८/०४/२००९ |

उक्त शेतजमिनीची खरेदीखते ही अवैध सावकारी व्यवहारात प्रतिभुती म्हणुन लिहुन दिलेली असल्याने ती खरेदीखते अवैध घोषित करुन या प्रकरणी महाराष्ट्र सावकारी (नियमन)अधिनियम २०१४ चे कलम १८ नुसार कार्यवाही करणे योग्य राहील. या अवैध सावकारी प्रकरणात सावकार गैरअर्जदार १ यांना गैरअर्जदार २ हे बेकायदेशीर रित्या त्यांचे हस्तक म्हणुन मदत करीत आहेत. सदर प्रकरण हे गंभिर स्वरूपाचे असून या प्रकरणी शेतकरी आत्महत्या होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा निष्कर्षा सह चौकशी अहवाल चौकशी अधिकारी यांनी सादर केलेला आहे.

२३,९८०/-, दिनांक २२/१२/२०१२ रोजी रू. ५०,०००/-, दिनांक २७/०२/२०१३ रोजी रू. १,५५,०००/-,दिनांक १२/०३/२०१५ रोजी रू. ८२,०००/- व दिनांक ०८/०७/२०१३ रोजी रू. ५०,०००/- जमा केलेल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे त्यांनी त्यांचे अभियोक्ते यांच्या मार्फत दाखल केलेल्या खुलाशास सहमती देता येत नाही. त्यामुळे ही शेतजमिन त्यांनी खरेदी केली नसल्याचे सिध्द होत आहे. या अवैध सावकारी व्यवसायात गैरअर्जदार २ व त्यांची पत्नी गैरअर्जदार ३ हे गैरअर्जदार १ यांचे हस्तक म्हणुन कामकाज करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे असे चौकशी अहवालात नमुद करून चौकशी अंती अर्जदार यांनी केलेल्या तक्रारीत पुर्णतः तथ्य आढळुन आलेले असल्याने या प्रकरणी पुढील प्रमाणे चौकशी निष्कर्ष चौकशी अहवालात दिलेला आहे.

चौकशी अधिकारी यांनी चौकशी अंती खालील नमुद खरेदी खत करुन देणारे ०५ शेतकरी यांनी अवैध सावकारी अंतर्गत व्याजाने पैसे घेवुन या पैशास धर म्हणुन खालील तक्त्यात नमुद केलेली ०७ खरेदी खतातील शेतजमिन अवैध सावकार गैरअर्जदार १ त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ व त्यांची पत्नी गैरअर्जदार ३ यांच्या नावाने प्रतिभुती म्हणुन नोंदणीकृत खरेदी खताव्दारे लिहुन दिलेली आहे.

| अ.क्र. | गट क्रमांक | क्षेत्र | गाव | खरेदीखत करून देणाऱ्याचे नाव | खरेदीखत करून घेणाऱ्याचे नाव | खरेदी खत क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३९ | ८० | वरठाण | संजय रामसिंग सोळंके | चिंतामण नारायण राऊत | ३७२/दि.०६/०३/२००९ |
| २ | २०६ | २३ | वरठाण | लताबाई बालु खंडाळे | संगिता सुभाष ठाकरे | ३६८/दि.०६/०३/२००९ |
| | | ४० | | रावसाहेब रतनसिंग सोळंके | संगिता सुभाष ठाकरे | १००१/दि.२७/०७/२००९ |
| | | २४ | | बालु त्र्यबंक खंडाळे | संगिता सुभाष ठाकरे | ३६७/दि.०६/०३/२००९ |
| ३ | १६७ | ७३ | वरठाण | विजय त्र्यंबक पाटील | सुभाष बळीराम ठाकरे | २०५/दि.०७/०२/२००९ |
| **४** | **६६** | **३०+३४** | **वरठाण** | **सुनिल आनंदा पाटील** | **संगिता सुभाष ठाकरे** | **३७३/दि.०६/०३/२००९** |
| ५ | १७४ | ५५ | वरठाण | विजय नामदेव सोळंके | चिंतामण नारायण राऊत | ५५३/दि.०८/०४/२००९ |

OF MONEYLENDERS AURANGABAD
सत्यमेव जयते
DIST. AURANGABAD

उक्त शेतजमिनीची खरेदीखते ही अवैध सावकारी व्यवहारात प्रतिभुती म्हणुन लिहुन दिलेली असल्याने ती खरेदीखते अवैध घोषित करुन या प्रकरणी महाराष्ट्र सावकारी (नियमन)अधिनियम २०१४ चे कलम १८ नुसार कार्यवाही करणे योग्य राहील. या अवैध सावकारी प्रकरणात सावकार गैरअर्जदार १ यांना गैरअर्जदार २ हे बेकायदेशीर रित्या त्यांचे हस्तक म्हणुन मदत करीत आहेत. सदर प्रकरण हे गंभिर स्वरूपाचे असून या प्रकरणी शेतकरी आत्महत्या होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा निष्कर्षा सह चौकशी अहवाल चौकशी अधिकारी यांनी सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रमाणे सुनावणीच्या वेळी प्राप्त झालेले अर्जदार व गैरअर्जदार यांचे म्हणने व लेखीपुरावे, गैरअर्जदार यांचे अभियोक्ते यांचा लेखी युक्तीवाद, चौकशी अधिकारी यांचा चौकशी अहवाल उपलब्ध साक्षीदार यांचे जवाब यावरून निदर्शनास आलेले मुद्दे व त्यावर कारणासह सुनावणी अंतिचे निष्कर्ष खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्तुतअर्जदार यांनी केलेली तक्रार ही अवैध सावकारी प्रकरणात मोडते काय? | होकारार्थी |
| २. | चौकशी अधिकारी यांनी सादर केलेला चौकशी अहवाल वस्तुस्थिती दर्शक आहे काय? | होकारार्थी |
| ३. | गैरअर्जदार २ व ३ हे गैरअर्जदार १ यांचे हस्तक म्हणुन काम करीत आहे काय? | होकारार्थी |
| ४. | प्रस्तुत अर्जदार यांनी त्यांची वरठाण शिवारातील गट नंबर ६६ मधील त्यांचे नावावरील (३०+३४)= ६४ आर शेतजमिन त्यांनी गैरअर्जदार १ सावकार यांचे हस्तक गैरअर्जदार क्र.२ श्री. सुभाष बळीराम ठाकरे यांच्या पत्नी गैरअर्जदार क्र. ३ सौ.संगिता सुभाष ठाकरे यांच्या नावावर सावकारी व्यवहारात प्रतिभुती म्हणुन दिली आहे काय? दिली असल्यास सदरची शेतजमिन महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये मुळहस्तांतरण कार यांना परत करणे योग्य आहे काय? | होकारार्थी |

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD ★ DIST. AURANGABAD ★ सत्यमेव जयते

**कारणमिमांसा**

या सावकारी व्यवहारातील खरेदी खत क्रमांक ३७३ दिनांक ०६/०३/२००९ गट नंबर ६६ क्षेत्र ६४ आर वरील साक्षीदार श्री. संजय रामसिंग सोळंके यांनी त्यांचा रू. १०० प्रतिज्ञापत्रावर जवाब सादर केला असून त्यांत त्यांनी नमुद केले आहे कीं, ते प्रस्तुत अर्जदार श्री. सुनिल आनंदा पाटील रा. वरठाण व गैरअर्जदार १ यांचे सावकारी व्यवहारात साक्षीदार आहे. श्री सुनिल आनंदा पाटील यांनी गैरअर्जदार १ यांचेकडुन भावाच्या आजार पणासाठी रू. १,२०,०००/- दमदशे ३% व्याजदराने रक्कम घेतली होती. व या पैशास धर म्हणुन प्रस्तुत अर्जदार **श्री. सुनिल आनंदा पाटील यांनी त्यांची मौजे वरठाण शिवारातील गट नंबर ६६ मधील ६४ आर** शेतजमिन गैरअर्जदार १ खाजगी सावकार यांच्या सांगितल्यानुसार परत पलटवुन देण्याच्या तोंडी बोलीवर गैरअर्जदार १ सावकार यांचा गैरअर्जदार २ हस्तक यांची गैरअर्जदार ३पत्नी यांच्या नावाने करून दिलेली आहे. दोघांमध्ये शेतजमिन खरेदी विक्रीचा व्यवहार नाही. शेतजमिन सावकारी व्यवहारात लिहुन दिलेली आहे.

या सावकारी व्यवहारातील इतर साक्षीदार श्री. बापु दादा सोळंके, श्री. प्रेमसिंग गणसिंग शिंदे व श्री. उमेदसिंग भावसाहेब सोळंके हे असुन ते वरठाण येथील महात्मा गांधी तंटामुक्त समिती वरठाणचे पदाधिकारी आहेत. त्यांनी त्यांची सभावृत्तांत माहिती त्यांचे लेटरहेडवर चौकशी अधिकारी यांचेकडे सादर केली असून त्यांत त्यांनी नमुद

केले आहे की, ते महात्मा गांधी तंटामुक्त समिती वरठाणचे पदाधिकारी आहे वरठाण येथील रहिवाशी गैरअर्जदार १ हे खाजगी सावकार असुन वरठाण येथील शेतकरी नामे श्री. सुनिल आनंदा पाटील, श्री. बालु त्र्यंबक खंडाळे, श्रीमती लताबाई बालु खंडाळे, श्री. रावसाहेब रतनसिंग सोळंके, श्री. विजय त्र्यंबक खंडाळे, श्री. विजय नामदेव सोळंके व श्री. संजय रामसिंग सोळंके यांच्याशी सावकारी व्यवहार केलेला असुन या गैरअर्जदार १ खाजगी सावकारी व्यवहारात त्यांनी या शेतकऱ्यांच्या शेतजमिनी स्वतःच्या नावाने व त्यांचा वरठाण येथील हस्तक गैरअर्जदार २ व हस्तकाची पत्नी गैरअर्जदार ३ यांच्या नावाने खरेदीखता आधारे लिहुन घेतलेल्या आहे. व्याजी व्यवहार असल्याने खरेदीखता आधारे लिहुन घेतलेल्या शेतजमिनी शेतकऱ्यांच्या ताब्यात आहे. ते शेतकरी हया शेतजमिनीवर पिक घेत आहे. शेतकरी व गैरअर्जदार १ सावकार यांच्यात घेतलेल्या रकमेवरील व्याजाचा वाद झाल्याने व्यवहार मिटविण्यासाठी गावात तंटामुक्त समितीची बैठक घेण्यात आलेली होती. या बैठकीतही गैरअर्जदार १ सावकार यांनी या शेतकऱ्यांना त्यांच्या मनाप्रमाणे व्याजाची मागणी केलेली होती ती न दिल्यास या शेतकऱ्यांच्या जमिन विकण्यात येईल असेही गैरअर्जदार १ सावकार यांनी बैठकीत सांगितलेले होते. शेतकऱ्यांनी गैरअर्जदार १ सावकारास मुद्दल रकमा व त्यावरील बऱ्याच प्रमाणात व्याजाच्या रकमा अदा केलेल्या आहे. तथापी गैरअर्जदार १ सावकार शेतकऱ्यांना त्यांच्या लिहुन घेतलेल्या शेतजमिनी परत पलटवुन देत नाही. तंटामुक्त समितीच्या बैठकीतुन सदर व्यवहाराचा वाद मिटलेला नाही. शेतकऱ्यांनी विंनती केल्या नुसार बैठकीची माहिती देत असल्याबाबत पत्रात नमुद आहे. या पत्रावर समितीचे अध्यक्ष श्री उमेदसिंग भाऊसाहेब सोळंके, पदसिंध्द अधिकारी श्री. प्रेमसिंग गणसिंग शिंदे व सदस्य श्री. बापु दादा सोळंके यांच्या स्वाक्षऱ्या आहे.

MONEYLENDERS AURANGABAD DIST. AURANGABAD

या प्रकरणात मा. तहसिलदार, सोयगांव यांनी त्यांचे पत्र दिनांक १८/१२/२०१५ नुसार तलाठी सजा बनोटी यांच्या मार्फत सविस्तर चौकशी अंती जमिनीच्या ताब्या बाबतचा अहवाल चौकशी अधिकारी यांचेकडे पाठविलेला असल्या बाबत चौकशी अहवालात नमुद आहे. तलाठी यांचे चौकशी अहवालानुसार शेतकऱ्यांच्या ताब्यात असलेल्या जमिन बाबतची माहिती पुढील प्रमाणे आहे.

१. संजय रामसिंग सोळंके गट नंबर ४९ मधील ८० आर जमिन संजय रामसिंग यांच्याच ताब्यात असुन त्यांनी ८० आर मध्ये कापुस हे पिक घेतलेले आहे.

२. लताबाई बालु खंडाळे गट नंबर २०६ मधील २३ आर जमिन लताबाई खंडाळे यांच्याच ताब्यात असुन त्यांनी २३ आर मध्ये कापुस हे पिक घेतलेले आहे.

३. रावसाहेब रतनसिंग सोळंके गट नंबर २०६ मधील ४० आर जमिन रावसाहेब सोळंके यांच्याच ताब्यात असुन त्यांनी ४० आर मध्ये मुग हे पिक घेतलेले आहे.

४. बालु त्र्यंबक खंडाळे गट नंबर २०६ मधील २४ आर जमिन बालु त्र्यंबक खंडाळे यांच्याच ताब्यात असुन त्यांनी २४ आर मध्ये मुग हे पिक घेतलेले आहे.

५. विजय त्र्यंबक पाटील गट नंबर १६७ मधील ७३ आर जमिन विजय त्र्यंबक पाटील यांच्याच ताब्यात असुन त्यांनी ७३ आर मध्ये केळी हे पिक घेतलेले आहे.

६. विजय नामदेव सोळंके गट नंबर १७४ मधील ५५आर जमिन विजय नामदेव सोळंके यांच्याच ताब्यात असुन त्यांनी ५५ आर मध्ये कापूस हे पिक घेतलेले आहे.

**७. सुनिल आनंदा पाटील गट नंबर ६६ मधील ३०+३४ एकूण ६४ आर जमिन त्यांच्या ताब्यात नसुन सदर जमिन सौ. रत्नाबाई अशोक वाघ यांच्या ताब्यात आहे व त्यावर त्यांनी मका हे पिक घेतलेले आहे.**

वरील १ ते ७ तक्रारदार शेतकरी यांचे जमिनी बाबतचा अहवाल प्राप्त असून त्यानुसार शेतजमिनी हया गैरअर्जदार १, गैरअर्जदार २ व गैरअर्जदार ३ यांच्या ताब्यात नसल्या बाबत तलाठी यांनी अहवाल सादर केलेला आहे.त्या मध्ये अर्जदार यांची शेतजमिन ही अर्जदार यांचे ताब्यात नसल्या बाबत तलाठी अहवाला वरून दिसुन येत आहे. तलाठी यांनी केलेल्या पंचनाम्यावर शेतजमिनीचे आजुबाजुचे शेतकरी श्री प्रकाश वामन पाटील, श्री. अशोक धनसिंग सोळंके, श्री. अनिल लोटन खंडाळे, श्री. लोटन किसन खंडाळे, श्री. बारकु धोंडु सोळंके व श्री. बालु त्र्यंबक खंडाळे यांच्या सहया असुन या पंचनाम्यावर पंचलोक म्हणुन श्री. उमेदसिंग भाऊसाहेब सोळंके, तंटामुक्ती अध्यक्ष, श्री. बापु दादा सोळंके, तंटामुक्ती संयोजक, श्री. अरूण नवलसिंग सोळंके, श्री. विठ्ठल यादव भोजने/ श्री. सुर्यवंशी, श्री. नारायण पुंडलीक सोळंके, श्री. भगवान बालु पवार व श्री. सुनिल नाना पाटील यांच्या सहया असुन पंचानाम्यावर तलाठी यांची सही आहे.

चौकशी अहवालानुसार गैरअर्जदार २ यांचे राहते घरी घेतलेल्या घरझडतीत त्यांचे दारिद्रयरेषा खालील प्रमाणपत्र व उत्पन्नाचे प्रमाणपत्र चौकशी कामी चौकशी अधिकारी यांनी ताब्यात घेतलेले आहे. त्यांनुसार गैरअर्जदार २ हे दारिद्रयरेषेखाली आहे. त्यांचे मा.तहसिलदार ,ता.सोयगाव यांनी दिनांक १६.०७.२०१२ रोजी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार त्यांचे सन २०११-१२ या वर्षाचे उत्पन्न रु.३५,०००/- आहे व त्यांना गटविकास अधिकारी पंचायत समिती, सोयगाव, विस्तार अधिकारी सांख्यिकी, पंचायत समिती सोयगाव व ग्रामविकास अधिकारी, वरठाण यांच्या एकत्रित सहीने ते दारीद्ररेषेखाली असल्याबाबत व त्यांचा समावेश अनुक्रमांक ५८ वर झालेला असल्याबाबत सन २००२ ते २००७ या कालावधीसाठी प्रमाणपत्र दिलेले आहे. अर्जदार यांनी गैरअर्जदार १ सावकार यांच्याशी केलेला व्यवहार हा याच कालावधीतील आहे.

ज्यांच्या विरूध्द अवैध सावकारी संबंधाने तक्रार आहे, ते गैरअर्जदार १, गैरअर्जदार २ व गैरअर्जदार ३ यांच्या वतीने म्हणने मांडण्यासाठी त्यांचे अभियोक्ते श्री. आर.ए.गिरी सोयगांव यांनी वकील पत्र सादर करून त्यांचा खुलासा चौकशी अधिकारी यांचेकडे सादर केलेला आहे. त्यात त्यांनी नमुद केले आहे की, गट नंबर २०६ मधील २४+४० एकूण ८७ आर जमिन व गट नंबर १४७ मधील ५५ आर जमिन सावकारी व्यवसायात घेतली हे तक्रारदार

प्रतिभुती म्हणुन दिलेली आहे हे चौकशी अंती सिध्द होत असल्या बाबत अहवालात नमुद करून त्याबाबतचे अर्जदार निहाय स्पष्टीकरण चौकशी अहवालात दिलेले आहे.

साक्षीदार यांचे जवाबावरून, गैरअर्जदार २ हस्तकाचे घरीं सापडलेल्या नोंदवहीतील नोंदीनुसार, व शेतजमिनीचा प्रत्यक्ष ताबा अर्जदार वगळता इतर सर्व तक्रारदार यांचा असल्याने गैरअर्जदार १ यांचा अवैध सावकारी व्यवसाय असल्याचे दिसुन येत आहे. या अवैध सावकारी व्यवसायात त्यांनी अर्जदार शेतकऱ्यांची शेतजमिन गैरअर्जदार १ यांनी स्वतःच्या नावे व त्यांचा गैरअर्जदार २ हस्तक व त्यांची पत्नी गैरअर्जदार ३ यांच्या नावाने प्रतिभुती म्हणुन नोंदणीकृत खरेदीखताद्वारे लिहुन घेतलेली आहे. त्या जमिनीचा तपशिल पुढील प्रमाणे,अर्जदार यांची पत्नी सौ. लताबाई बालु खंडाळे यांची गट नंबर २०६ मधील २३ आर, श्री. रावसाहेब रतनसिंग खंडाळे यांची ४० व अर्जदार यांची २४ आर (अशी अर्जदार याच्या एकत्रीत कुटुंबातील एकूण ८७ आर शेतजमिन), श्री. विजय त्रिंबक पाटील यांचे गट नंबर १६७ मधील ७३ आर, श्री. सुनिल आनंदा पाटील गट नंबर ६६ मधील यांचे ६४ आर श्री. विजय नामदेव सोळंके यांचे गट नंबर १७४ मधील ५५ आर व श्री. संजय रामसिंग सोळंके यांची गट नंबर ३९ मधील ८० आर शेतजमिन आहे. या सर्व शेतजमिनीचे व्यवहार हे खरेदी विक्रीचे नसुन हया शेतजमिनी अवैध सावकारी व्यवसायात व्याजाने दिलेल्या पैशास धर म्हणुन प्रतिभुती म्हणुन लिहुन घेतल्याचे चौकशी अंती सकृत दर्शनी दिसुन येत आहे.असा चौकशी अहवाल दिलेला आहे.

MONEYLENDERS AURANGABAD
सत्यमेव जयते
DIST. AURANGABAD

गैरअर्जदार १ यांचे अभियोक्ते श्री. अशोक गिरी यांनी गैरअर्जदार १, गैरअर्जदार २ व गैरअर्जदार ३ यांच्या वतीने म्हणने चौकशी अधिकारी यांचेकडे सादर केलेले असून त्यांत नमुद केले आहे की, या व्यवहारात गैरअर्जदार १ यांचा संबंध नसुन ते कोणतीही सावकारी करीत नाही. व्याज घेत नाही. अर्जदार यांनी त्रास देण्याच्या उद्देशाने खोटी तक्रार दिलेली आहे. सदरची शेतजमिन गैरअर्जदार २ व गैरअर्जदार ३ यांनी कायमस्वरूपी खरेदी केलेली आहे. या म्हणन्यास चौकशी अधिकारी म्हणुन सहमती दिलेली नाही. कारण अर्जदार शेतकरी यांनी सावकारी व्यवहारात करून दिलेले शेतजमिनीचे खरेदीखते सन २००९ या कालावधीतील असून त्या कालावधीत गैरअर्जदार २ हे दारीद्रयरेषेखाली आहे. तसेच त्यांनी त्यांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र सुध्दा मा. तहसिलदार सोयगांव यांचेकडुन दिनांक १६/०७/२०१२ रोजी काढलेले आहे. त्यानुसार त्यांचे सन २०११-१२ या वर्षाचे उत्पन्न रू.३५,०००/- आहे. तसेच ग्रामसेवक वरठाण यांनी त्यांना दिनांक ०९/१०/२०१० रोजी ते दारिद्ररेषेत असल्याचे प्रमाणपत्र दिलेले आहे.

तसेच गैरअर्जदार ०१ सावकार यांनी अनेक लोकांशी अवैध सावकारी व्यवहार केलेला आहे. या अवैध सावकारी व्यवसायात त्यांनी तक्रारदार शेतक-यांच्या जमिनी स्वतःचे नावे व गैरअर्जदार ०२ व ०३ चे नावाने केलेल्या आहेत. त्या शेत जमिनीचा ताबा हा अर्जदार वगळता इतर सर्व तक्रारदार यांचेकडेच आहे.त्यामुळे उक्त शेतजमिनी या त्यांनी खरेदी केलेल्या नसुन त्या शेतजमिनी सावकारी व्यवहारात धर म्हणुन गैरअर्जदार १ सावकार यांनी त्यांचे नावावर व गैरअर्जदार २ व ३ याचे नावावर अवैध सावकारी व्यवसायात गहाण खत म्हणुन खरेदी

खताव्दारे लिहुन घेतल्याचे दिसुन येते.जमिन खरेदी विक्रीचा व्यवहार असल्यास शेत जमिनीचा ताबा हा जमिन खरेदी करणा-या व्यक्तीकडे लगेचच देण्यात येतो या ठिकाणी शेत जमिनीचा ताबा हा अर्जदार वगळात इतर सर्व तक्रारदार यांच्याकडेच आहे. व अर्जदार यांनी त्याची शेतजमिन विक्री करण्याचा करार श्री. रत्नाबाई अशोक वाघ यांचेशी केलेला दिसुन येतो. यावरुन व व्यवहारातील साक्षीदार यांचे जवाबानुसार सदर व्यवहार हा अवैध सावकारीत असल्याचे दिसुन आलेले आहे. गैरअर्जदार २ यांच्या घरझडती मध्ये चौकशी कामी ताब्यात घेतलेल्या रेकॉर्ड नुसार त्यांचे घरी गैरअर्जदार १ यांच्या नावाचे विविध बँकाचे पासबुक सापडलेले असून त्या बँक खात्यामध्ये गैरअर्जदार २ यांनी मोठया प्रमाणात रकमा जमा केल्याचे दिसुन येत आहेत. त्या बाबतचा तपशिल बँक ऑफ महाराष्ट्र शाखा बनोटी दिनांक ०१/०८/२०१३ रोजी रू. १,००,०००/-, दिनांक ०८/०८/२०१३ रोजी रू. ८०,०००/-, दिनांक २२/०२/२०१३ रोजी रू.१,५०,०००/-, दिनांक २६/०३/२०११ रोजी रू. २३,९८०/-, दिनांक २२/१२/२०१२ रोजी रू. ५०,०००/-, दिनांक २७/०२/२०१३ रोजी रू. १,५५,०००/-,दिनांक १२/०३/२०१५ रोजी रू. ८२,०००/- व दिनांक ०८/०७/२०१३ रोजी रू. ५०,०००/- जमा केलेल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे त्यांनी त्यांचे अभियोक्ते यांच्या मार्फत दाखल केलेल्या खुलाश्यास सहमती देता येत नाही. या अवैध सावकारी व्यवसायात गैरअर्जदार २ व त्यांची पत्नी गैरअर्जदार ३ हे गैरअर्जदार १ यांचे हस्तक म्हणुन कामकाज करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे असे चौकशी अहवालात नमुद करून चौकशी अंती अर्जदार यांनी केलेल्या तक्रारीत पुर्णतः तथ्य आढळुन आलेले असल्याने या प्रकरणी पुढील प्रमाणे चौकशी निष्कर्ष चौकशी अहवालात दिलेला आहे.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD ★ DIST. AURANGABAD ★ सत्यमेव जयते

चौकशी अंती खालील नमुद खरेदी खत करुन देणारे ०५ शेतकरी यांनी अवैध सावकारी अंतर्गत व्याजाने पैसे घेवुन या पैशास धर म्हणुन खालील तक्त्यात नमुद केलेली ०७ खरेदी खतातील शेतजमिन अवैध सावकार गैरअर्जदार १ त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ व त्यांची पत्नी गैरअर्जदार ३ यांच्या नावाने प्रतिभुती म्हणुन नोंदणीकृत खरेदी खताव्दारे लिहुन दिलेली आहे.

| अ.क्र. | गट क्रमांक | क्षेत्र | गाव | खरेदीखत करून देणाऱ्याचे नाव | खरेदीखत करून घेणाऱ्याचे नाव | खरेदी खत क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ३९ | ८० | वरठाण | संजय रामसिंग सोळंके | चिंतामण नारायण राऊत | ३७२/दि.०६/०३/२००९ |
| २ | २०६ | २३ | वरठाण | लताबाई बालु खंडाळे | संगिता सुभाष ठाकरे | ३६८/दि.०६/०३/२००९ |
| | | ४० | | रावसाहेब रतनसिंग सोळंके | संगिता सुभाष ठाकरे | १००१/दि.२७/०७/२००९ |
| | | २४ | | बालु त्र्यबंक खंडाळे | संगिता सुभाष ठाकरे | ३६७/दि.०६/०३/२००९ |
| ३ | १६७ | ७३ | वरठाण | विजय त्र्यंबक पाटील | सुभाष बळीराम ठाकरे | २०५/दि.०७/०२/२००९ |
| **४** | **६६** | **३०+३४** | **वरठाण** | **सुनिल आनंदा पाटील** | **संगिता सुभाष ठाकरे** | **३७३/दि.०६/०३/२००९** |
| ५ | १७४ | ५५ | वरठाण | विजय नामदेव सोळंके | चिंतामण नारायण राऊत | ५५३/दि.०८/०४/२००९ |

उक्त शेतजमिनीची खरेदीखते ही अवैध सावकारी व्यवहारात प्रतिभुती म्हणुन लिहुन दिलेली असल्याने ती खरेदीखते अवैध घोषित करुन या प्रकरणी महाराष्ट्र सावकारी (नियमन)अधिनियम २०१४ चे कलम १८ नुसार कार्यवाहीकरणे योग्य राहिल.या अवैध सावकारी प्रकरणात सावकार गैरअर्जदार १ यांना गैरअर्जदार २ हे बेकायदेशीर रित्या त्यांचे हस्तक म्हणुन मदत करीत आहेत. सदर प्रकरण हे गंभिर स्वरूपाचे असून या प्रकरणी शेतकरी आत्महत्या होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा निष्कर्षा सह चौकशी अहवाल सादर केलेला आहे.

सुनावणी अंती गैरअर्जदार यांनी त्यांचे म्हणने लेखी सादर केलेले आहे. त्यांनी जे म्हणने चौकशी अधिकारी यांचेकडे सादर केले होते तेच म्हणने सुनावणीच्या वेळी सादर केलेले आहे. या व्यतीरिक्त व्यवहारातील कोणत्याही साक्षीदारांचे जवाब व इतर माहिती सादर केलेली नाही. त्यामुळे चौकशी अधिकारी यांचे अहवालात इत्तमभुत माहिती असून तो वस्तुनिष्ट असल्याने गैरअर्जदार यांचे अभियोक्ते यांनी सादर केलेल्या म्हणन्यास पुष्टी देता येत नाही.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त चौकशी अहवाल, झालेले साक्षिदारांचे जवाब हे अर्जदार यांनी केलेला व्यवहार हा अवैध सावकारी अंतर्गत असल्या बाबत पुष्टी देत आहे. सदर सावकारी व्यवहारातील इतर साक्षिदार तथा तंटामुक्त समितीचे पदाधिकारी यांचे पत्र हे सुध्दा अर्जदार यांनी गैरअर्जदार यांच्याशी केलेला व्यवहार हा अवैध सावकारीचा असल्याचे नमुद करीत आहे. गैरअर्जदार यांचे विरूध्द प्राप्त तक्रारीचे चौकशीनुसार गैरअर्जदार यांनी बऱ्याच लोकांशी अवैध सावकारी व्यवहार केलेला आहे. हे सुनावणी अंती व चौकशी अंती सिध्द होत आहे. त्यामुळे सुनावणी अंतीचे निष्कर्ष हे होकारार्थी दिलेले आहे. गैरअर्जदार १ यांनी त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांचा वापर या व्यवहारात केल्याचे दिसुन येत आहे. या बाबीस गैरअर्जदार २ हे सदर कालावधीत ते दारीद्रीयरेषेत असल्याचे प्रमाणपत्रावरून दिसुन येत आहे. गैरअर्जदार २ यांनी गैरअर्जदार १ यांच्या बँक खात्यामध्ये बराच व्यवहार केलेला आहे. त्यामुळे ते गैरअर्जदार १ सावकार यांचे हस्तक म्हणुन कामकाज करीत असल्याचे सिध्द होते.

या बाबी पाहता सदर व्यवहार हा अवैध सावकारी अंतर्गत असून प्रस्तुत अर्जदार **श्री. सुनिल आनंदा पाटील रा. वरठाण ता. सोयगांव यांनी त्यांची गट नंबर ६६ मधील ६४ आर शेतजमिनी खरेदी खत क्रमांक ३७३ दिनांक ०६/०३/२००९** अन्वये सावकारी व्यवसायात गैरअर्जदार १ सावकारी श्री. चिंतामण नारायण राऊत यांच्या सांगितल्या वरून त्यांचा हस्तक गैरअर्जदार २ श्री. सुभाष बळीराम ठाकरे यांची पत्नी गैरअर्जदार ३ सौ. संगिता सुभाष ठाकरे यांच्या नावाने प्रतिभुती म्हणुन दिलेली आहे हे सिध्द होत असून सदरचे खरेदीखत हे सावकारी अंतर्गत गहाणखत असल्याने ते अवैध घोषीत करून ही शेतजमिन मुळहस्तांतरणकार यांना परत करणे योग्य असल्याने त्या बाबत खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

मी.एन.व्ही.आघाव, सावकाराचे जिल्हा निबंधक, तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद महाराष्ट्र सावकारी (नियमन)अधिनियम २०१४ चे कलम १८ नुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून प्रस्तुत अर्जदार **श्री. सुनिल आनंदा पाटील रा. वरठाण ता. सोयगांव यांनी त्यांची गट नंबर ६६ मधील ६४**

**आर शेतजमिन खरेदी खत क्रमांक ३७३ दिनांक ०६/०३/२००९** अन्वये गैरअर्जदार १ सावकार श्री. चिंतामण नारायण राऊत यांचा हस्तक गैरअर्जदार २ यांची पत्नी गैरअर्जदार ३ सौ. संगिता सुभाष ठाकरे यांच्या नावाने सावकारीच्या ओघात प्रतिभुती म्हणुन खरेदीखता द्वारे लिहुन दिलेली असल्याने सदर शेतजमिनीचे खरेदीखत क्रमांक ३७३ दिनांक ०६/०३/२००९ हे सावकारी अंतर्गत गहाणखत असल्याने ते अवैध असल्याचे घोषीत करून रद्द करण्यात येत आहे. आणि ही शेतजमिन महाराष्ट्र सावकारी (नियमन)अधिनियम २०१४ चे कलम १८ अन्वये अभिहस्तांतरण करणारे मुळ मालक अर्जदार **श्री. सुनिल आनंदा पाटील रा. वरठाण ता. सोयगांव** यांना परत करण्यात येत आहे.

सदर आदेश आज दिनांक २३/०३/२०१६ रोजी माझी सही व कार्यालयाच्या मुद्रेसह पारीत केला आहे.

REGISTRAR OF MONEYLENDERS AURANGABAD
सत्यमेव जयते
DIST. AURANGABAD

(एन.व्ही.आघाव)
सावकाराचे जिल्हा निबंधक,
तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, औरंगाबाद

**प्रत :- १.** मा. उपविभागीय अधिकारी, सिल्लोड यांना पुढील कार्यवाहीस्तव माहितीस्तव.

२. मा. तहसिलदार,सोयगांव यांना पुढील कार्यवाहीस्तव देण्यात येत आहे.

३. तलाठी सजा,बनोटी ता. सोयगांव यांना देऊन कळविण्यात येते की,उक्त प्रकरणात योग्य ती कार्यवाही करावी.

४.सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ता. सिल्लोड यांना त्यांचा चौकशी अहवाल दिनांक १३/०१/२०१६ चे संदर्भात

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे.

२. मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद.

सावकाराचे जिल्हा निबंधक,
तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, औरंगाबाद